रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २३० । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**सुट्टीची सूचना**

प्रजासत्ताकदिनानिमित्त सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी कृषीवल कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# गावगुंडांना दणका


## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी कंबर कसली

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

**मागील नगरपरिषद निवडणुकीत झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर यावेळी कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी रायगड पोलिसांनी कडक उपाययोजना केल्या आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका शांततेत व सुरळीत पार पडाव्यात, यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून, आतापर्यंत तब्बल १ हजार ४० गावगुंड व सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, गावांमध्ये गुन्हेगारीच्या बळावर दहशत पसरवणाऱ्या गावगुंडांना चांगल्या वर्तणुकीची तंबी देत त्यांच्याकडून चांगल्या वागणुकीची हमीपत्रे लिहून घेण्यात आली आहेत.**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी निवडणूक होत असून, ५ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ही प्रक्रिया शांततेत पार पडावी, नागरिकांना निर्भीडपणे मतदान करता यावे, यासाठी रायगड पोलीस सुरक्षेच्या दृष्टीने पूर्णपणे सज्ज झाले आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहेत.

निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. गावांमध्ये गुंडगिरी करणाऱ्यांसह अधिक गुन्हे दाखल असलेल्या गुंडांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून चांगल्या वर्तणुकीची हमीपत्रे घेण्यात आली आहेत. आतापर्यंत ९ जणांना हद्दपार करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी प्रत्येक



संशयास्पद हालचालीवर बारीक लक्ष ठेवण्यात येत आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाईचे सत्र सुरू केले आहे. रायगड पोलिसांनी गेल्या महिन्याभरापासून निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.मतदारांवर विविध पद्धतीने दबाव टाकणारे तसेच सराईत गुन्हेगारांची माहिती संकलित करून त्यांच्याविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील १ हजार ४० जणांविरोधात अशी कारवाई करण्यात आली आहे.

### कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

मतदान व मतमोजणीच्या कालावधीत सुमारे २ हजार कर्मचाऱ्यांची गरज भासणार असल्याने त्यांच्या प्रशिक्षणालाही सुरुवात करण्यात आली आहे. अलिबाग येथे आरसीएफ वसाहतीतील सभागृहात दिवसभर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय कामकाज योग्य पद्धतीने पार पाडता यावे यासाठी कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

### प्रशासकीय राजवट संपणार

जिल्ह्यातील १७ लाख ३८१ मतदार ५ फेब्रुवारी रोजी आपला मतदानाचा हक्क बजावणार असून, सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत २ हजार ३२३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतमोजणी शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी होणार असून, मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेवरील प्रशासकीय राजवट संपून लवकरच राजकीय राजवटीची सुरुवात होणार आहे.

### १,४३० शस्त्रे ताब्यात


मागील निवडणुकीदरम्यान खालापूर येथे भररस्त्यात झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. तसेच, महाडमध्ये शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा होऊन बंदूक उगारण्यात आली होती. या घटनांमुळे निवडणुकीला गालबोट लागले होते. यावेळी मात्र अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांनी विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना तंबी दिली असून, हाणामारी व राडे होऊ नयेत याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. राजकीय वातावरण तापण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी शस्त्रसाठा जप्त करण्यास सुरुवात केली असून, आतापर्यंत १ हजार ४३० शस्त्रे ताब्यात घेण्यात आली आहेत.

# जिल्ह्यात ३६,५२८ दुबार मतदार

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. दि.५ फेब्रुवारी रोजी निवडणूका पार पडणार आहेत. दरम्यान, देशात दुबार मतदारांवरून रणकंदन वाजले असतानाच रायगड जिल्हा परिषदेत हजारो मतदारांची नावे संभाव्य दुबार यादीत आली आहेत. तत्पुर्वी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीतील नावांमध्ये पुनरावृत्ती झालेल्या नोंदी तपासून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बीएलओंमार्फत तातडीने त्याची पडताळणी आली. त्यात जिल्ह्यातील ग्रामीण भागात ३६ हजार ५२८ दुबार नावे मतदार यादीत आढळली आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे पडघम वाजल्याने स्थानिक पातळीवर राजकीय रणधुमाळी सुरू झाली असली, तरी मतदार यादीतील दुबार नावांचा ताण आहे. निवडणूक आयोगाने सर्व



जिल्हा परिषदांमधील संभाव्य दुबार मतदारांची यादी पाठवली आहे. निवडणुकीपूर्वी त्यांची

•> पान २ वर

**तालुका : संभाव्य दुबार मतदार**

| तालुका | | संख्या |
|---|---|---|
| अलिबाग | : | 2,282 |
| मुरुड | : | 882 |
| पेण | : | 6,606 |
| पनवेल | : | 7,126 |
| उरण | : | 4,750 |
| कर्जत | : | 3,098 |
| खालापूर | : | 282 |
| माणगाव | : | 3,223 |
| तळा | : | 465 |
| रोहा | : | 2,037 |
| सुधागड | : | 980 |
| महाड | : | 2,653 |
| पोलादपूर | : | 890 |
| श्रीवर्धन | : | 717 |
| म्हसळा | : | 537 |
| एकूण | : | 36,528 |

### दुबार मतदारांसाठी असणारे पर्याय

दोन किंवा त्यापेक्षा जास्त मतदारसंघातील मतदार यादीत नाव असेल किंवा एकाच मतदारसंघात दोन-तीन मतदान केंद्रांवर नाव असेल, तर त्यांना त्यापैकी एकाच केंद्राची निवड करावी लागणार आहे. जर या पर्यायाला मतदाराकडून प्रतिसाद नसेल, तर मतदार यादीतील नावापुढे दुबारचा शिक्का लागणार आहे. संबंधित दुबार मतदार मतदानासाठी एका केंद्रावर आला असता त्याठिकाणी त्यांचे 'मी या केंद्रावर मतदान करत असून, अन्य केंद्रांवर मतदान करणार नाही', असे हमी पत्र लिहून घेतले जाणार आहे.

## वेधक

### ट्रक पलटी होऊन वाहनांचे नुकसान

**पनवेल** :पनवेल जवळील सांगुर्ली गावाजवळ सकाळी एक ट्रक पलटी होऊन झालेल्या अपघातात चार वाहनांचे नुकसान झाले असून एक जण जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पळस्पे-पेण महामार्गावरून मालाने भरलेला ट्रक जात असताना अचानक रस्त्यावर पलटी होऊन तो मागे सरकत गेला. त्यामुळे पलटी झालेला ट्रक मागून येणारा टेम्पो, चारचाकी वाहन, शाळेची व्हॅन व मोटार सायकल यांना धडकला. या धडकेमुळे या चारही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### डेब्रिज टाकणाऱ्या डंपरवर कारवाई

**उरण** : प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या बेकायदेशीर डेब्रिजमूळे उरणमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. नवी मुंबई तसेच मुंबईमधील डेब्रिज, घाण, कचरा उरणमध्ये टाकण्यात येत असल्यामुळे उरणच्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यापूर्वी अनेक डंपर चालकांवर कारवाई करण्यात आली होती. परंतु, पुन्हा अशाच घटना घडू लागल्या आहेत. चिर्ले भागातील हॉटेल गंगा रसोई या हॉटेलसमोरील रस्त्याच्या कडेला दि.२३ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास माती आणि रॅबिट असलेले डेब्रिज टाकण्यासाठी काही डंपर आले होते. याबाबतची माहिती सिडकोच्या पथकाला मिळाल्यानंतर •> पान २ वर

### खासगी व्हिडीओवरून दोघींचे भांडण

**पेण** : तालुक्यातील हमरापूर गावात खासगी व्हिडीओवरून दोघींचे भांडण झाल्याची घटना घडली आहे. याबाबत दादर सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेतील ३२ वर्षीय पीडित महिला ही कुंभारआळी-हमरापूर येथील रहिवासी आहे. तर, खासगी व्हिडीओ प्रसिद्ध करणारी २१ वर्षीय महिला ही देखील हमरापूर येथील रहिवासी आहे. पीडित महिला ही उपसरपंचपदासाठी निवडणूक लढत होती. त्यामध्ये ती निवडून देखील आली. मात्र, याबाबत तिच्या प्रतिस्पर्धी असलेल्या व्यक्तिच्या शेजारी राहणाऱ्या महिलेने त्याचा राग मनात धरून पीडित महिलेचा खासगी व्हिडीओ प्रसिद्ध केला. त्यावरून दोघींमध्ये •> पान २ वर

# बेलकडे फाट्यावरील फलक उघडेच

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

निवडणूकीत आचार संहितेचा भंग होऊ नये म्हणून निवडणूक विभागाने कंबर कसली आहे. हजारो फलक काढल्याचा दावा देखील त्यांच्याकडून करण्यात आला आहे. परंतु, बेलकडे फाट्यावरील आमदारांच्या भूमीपुजनाच्या फलकाला झाकून ठेवण्यास प्रशासनाने दुर्लक्ष केल्याची चर्चा होत आहे.

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीचा कार्यक्रम नुकताच जाहीर झाला आहे. जिल्हाधिकारी तथा




**प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष?**

निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी बैठक घेऊन आचार संहितेचे पालन करण्याची सुचना अधिकाऱ्यांना दिल्या. अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे. दि.५ फेब्रुवारीला मतदान असणार आहे. या कालावधीत आचार संहितेचा भंग होऊ नये म्हणून नियमावली तयार करण्यात आली आहे. यादरम्यान, जिल्ह्यातील नाक्या नाक्यावर असणारे राजकीय फलक काढण्यात आले आहेत. तसेच, भूमीपूजन व उद्घाटनाचे फलक झाकून ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे हजारो फलक काढण्याचा दावा प्रशासनाने केला आहे. मात्र, त्यांचा •> पान २ वर

# सलगच्या सुट्ट्यांमुळे मुरूडची कोंडी

। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरातील जंजिरा किल्ला व इतर पर्यटन स्थळ पाहण्यासाठी वर्षाला लाखो पर्यटक राज्यभरातून आपली खासगी वाहने घेऊन येत असतात. त्यामुळे मुरुड शहरात येणाऱ्या वाहनांची संख्या पुर्वीपेक्षा दहा पट वाढली आहे. त्यामानाने नगरपरिषदेचे रस्ते अरुंद असल्याने शहरात पार्किंगची समस्या देखील मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. दरम्यान, शनिवार-रविवार व प्रजासत्ताक दिनाच्या सलगच्या सुट्ट्या आल्याने मुरूड



शहर फुल्ल झाले असून वाहतूक कोंडीत अडकले आहे. त्यामुळे शहर परिसरातील पार्किंगसाठीची स्वतंत्र नियोजनाची गरज भासू लागली आहे.

मुरूड शहराला ऐतिहासीक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटक याठिकाणी येत असतात. परंतु, शहरातील अरूंद रस्ते आणि पार्किंगची समस्या असल्यामुळे याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची प्रचंड कोंडी होते. त्यातच आताच्या तीन दिवसीय सलगच्या सुट्ट्यांमुळे •> पान २ वर

# पद्म पुरस्कारांची घोषणा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला भारत सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यावर्षी तब्बल १३१ जणांना पद्म पुरस्काराने गैरवण्यात येणार आहे. ज्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. कला, समाज सेवा, उद्योग, विज्ञान, वैद्यकशास्त्र आणि खेळ अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना पद्म पुरस्काराने गैरवण्यात आले आहे. ज्यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत, अशा व्यक्तींना राष्ट्रपती भवनात आयोजित खास कार्यक्रमामध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यावेळी धर्मेंद्र सिंह देओल यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच, केटी थॉमसन, एन. राजम, पी. नारायण आणि व्ही. एस. अच्युतानंदन यांनादेखील पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. तर, अलका याज्ञिक, भगतसिंग कोश्यारी, कल्लीपट्टी रामासामी पलानीस्वामी, मामूट्टी, डॉ. नोरी दत्तात्रेयडू, •> पान २ वर

# उरण शहरात कुत्र्यांची दहशत

- **बोरीत ज्येष्ठ नागरिकावर हल्ला**
- **नगरपरिषद प्रशासनाचा ढिसाळ कारभार**

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या ढिसाळ आणि बेफिकीर कारभारामुळे मोकाट कुत्र्यांची दहशत वाढत चालली आहे. त्याचा फटका थेट सामान्य नागरिकांच्या जीवावर बेतू लागला आहे.

बोरी गावातील विजय मांजरेकर उर्फ विजू (७२) यांच्यावर रविवारी (दि.२५) सकाळच्या सुमारास मोकाट कुत्र्यांनी अचानक हल्ला करून पायाचा गंभीर चावा घेतल्याची



धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेनंतर डॉ. प्रशांत बोंद्रे यांनी तत्काळ प्रसंगावधान राखत त्यांना उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, जखम अत्यंत खोलवर व गंभीर स्वरूपाची असल्याने, प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे, अशी माहिती मिळाली आहे.

या घटनेमुळे बोरीसह आसपासच्या •> पान २ वर

# गुरे चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## नागरिकांच्या सतर्कतेमुळे तिघे जेरबंद



। उरण । प्रतिनिधी ।

उरण-चाणजे येथील मुळेखंड या ठिकाणांहून रविवारी (दि.२५) मध्यरात्रीनंतर अंधाराचा फायदा घेऊन चारचाकी गाडीमधून गुरे पळवून नेणाऱ्या तीघांना अटक करण्यात उरण पोलिसांना यश आले आहे. तसेच, या थरारक घटनेतून उमेश कोळी या तरुणाला व गुरांना चोरट्यांच्या तावडीतून सोडविण्यास नागरिकांना व पोलीसांना यश आले आहे.

चाणजे सरपंच अजय म्हात्रे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री साडेतीन वाजण्याच्या सुमारास उमेश कोळी हा तरूण कामावरून आपल्या घरी येत होता. त्याचदरम्यान एक व्यक्ती गुरांना पकडण्याचा प्रयत्न करत होता. यासंदर्भात उमेश यांनी त्याला जाब विचारला असता, त्या व्यक्तीने उमेशला पकडून दमबाजी केली आणि चारचाकी गाडीत बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी प्रसंगावधान बाळगून उमेश कोळी यांनी आपल्या मोबाईलवरुन मित्रांना फोन करून तसेच गावातील ग्रुपवर मसेज व्हायरल करून या घटनेबाबत माहिती दिली. त्यांचा हा मेसेज बघताच त्याच्या मित्राने संबंधित चारचाकीचा पाठलाग केला. यावेळी चोरट्यांनी गाडी पळविण्याचा प्रयत्न केला असता, चारचाकी गाडीला अपघात होऊन रस्त्याच्या कडेला पलटी झाली. या घटनेची माहिती तात्काळ उरण पोलीसांना देण्यात आली. दरम्यान, संतप्त नागरिकांनी गुरे चोरून नेणाऱ्या व्यक्तीला चोप दिला आणि उमेश कोळीसह गुरांची सोडवणूक केली. त्यानंतर उरण पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन गुरे चोरणाऱ्या तिघांसह चारचाकी गाडी ताब्यात घेतली.

> काही दिवसांपासून उरण तालुक्यात गुरे चोरणाऱ्या टोळीच्या गाडीने धुमाकूळ घातल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेसंदर्भात उरण पोलिसांनी ठोस तपास करुन गुरे चोरणाऱ्या टोळीवर ठोस कारवाई करावी. तसेच, त्यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. - सचिन डाऊर, सामाजिक कार्यकर्ते

**विधानसभेची निवडणूक उधारीवर** | **निवडणूक विभागाची उदासीनता उघड**

# अलिबाग-पेणमधील ठेकेदारांचे दोन कोटी थकले

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात विधानसभा निवडणूक सुरळीत पार पाडल्याचा गाजावाजा झाला. लोकशाहीचा उत्सव यशस्वी झाल्याचे श्रेय प्रशासनाने घेतले. मात्र, या उत्सावाचा खर्च ज्यांनी उचलला, त्या वेंडर आणि ठेकेदारांचे २ कोटी रुपये आजही हवेतच लटकले आहेत. अलिबाग आणि पेणमधील मंडप, साऊंड, जनरेटर, इलेक्ट्रिक साहित्य पुरवणाऱ्या वेंडरचे तब्बल ३ महिन्यांपासून पैसे थकीत आहेत. मतदान पार पडले, मतमोजणी झाली, निवडणूक निकाल लागला, पण वेंडरच्या बिलांचा निकाल मात्र अजून लागलेला नाही.

रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक विभागाने कंबर कसली होती. निवडणुकीसाठी लागणारे मंडप, जनरेटर, इलेक्ट्रीक साऊंड सिस्टीम, स्क्रीन आदी कामांसाठी वेंडरची नियुक्ती करण्यात आली होती. या कालावधीत शेकडो जणांना रोजगार मिळाला. परंतु, वेंडरच्या कामांचे बिल अद्याप मिळाले नसल्याने अनेकांवर आर्थिक संकट उभे राहिले आहे. बिलांसाठी वेंडरला बिलांसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयात चपला झिजवाव्या लागत आहेत.

अलिबाग, पनवेल, पेण, कर्जत, महाड, श्रीवर्धन, उरण या सात विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम ऑक्टोबर महिन्यामध्ये जाहीर झाला होता. २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होती. ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी लागणारे साहित्य, •> पान २ वर

### निवडणुकीसाठी दीड कोटींचा ठेका

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच कार्यक्रम पार पडला असून, मंगळवारी (दि.२७) दुपारी अंतिम उमेदवार जाहीर केले जाणार आहेत. त्यानंतर मतदान ५ फेब्रुवारीला व मतमोजणी ७ फेब्रुवारीला होणार आहे. या निवडणुकीत लागणारे इलेक्ट्रीक साहित्यांसह साऊंड, मंडप इत्यादी साहित्यांचा पुरवठा करण्यासाठी दीड कोटी रुपयांचा ठेका एका बोरील एजन्सीला देण्यात आल्याची चर्चा आहे. हा ठेका कोल्हापूरमधील एका एजन्सीला दिला असल्याची चर्चा आहे.

> निवडणुकीच्या कामानिमित्त लागणारे मंडप, खुर्ची, साऊंड सिस्टीम आदी कामांचे करोडो रुपयांचे बिल थकीत आहे. डिसेंबरला देतो, असे सांगितले होते. जानेवारीवारीच्या पहिल्या आठवड्यात देतो असे सांगितले होते. लोकशाही टिकवण्यासाठी झटणाऱ्यांनाच जर आर्थिक संकटात ढकलले जात असेल, तर ही निवडणूक नेमकी कोणासाठी झाली? संबंधित अधिकारी वेळकाढूपणा करीत आहेत. कामांचे थकीत बिल वेळेवर न मिळाल्याने मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.
>
> **- वेंडर (नाव न सांगण्याच्या अटीवरून)**

### ढगाळ वातावरणामुळे पावसाची स्थिती

। मुंबई । प्रतिनिधी ।

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह राज्यातील बहुतांश भागात सध्या अंशतः ढगाळ हवामान असून पहाटेच्या वेळी धुक्याची स्थिती आहे. दुपारच्या सुमारास उन्हाचा चटका वाढत असून, नागरिकांना काहीसा उकाडा देखील जाणवत आहे. त्यामुळे राज्याच्या किमान तापमानात वाढ राहण्याची शक्यता असून, थंडी कमी-अधिक स्वरूपाची राहणार आहे. दरम्यान, पश्चीम महाराष्ट्रात ढगाळ वातावरणामुळे पाऊस पडण्याची स्थिती निर्माण झाली होती. परंतु, हवामान विभागाच्या अंदाजानुसार ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# आंबा मोहोर समाधानकारक

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

पोषक वातावरणामुळे उरण तालुक्यात आंब्याची झाडे बहरलेली आहेत. आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहर आला असून, काही ठिकाणी आंबे देखील आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उरण परिसरात भरघोस आंबा पिक येण्याचा अंदाज असल्याने, तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात सर्वसामान्य ग्राहकांना आंब्याची चव चाखता येणार आहे.



उरण तालुक्यात यावर्षी सुरुवातीला काही भागात ढगाळ वातावरण व नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी तुरळक अवेळी पाऊस झाल्यामुळे आंब्याच्या झाडांवर विपरीत परिणाम झाला होता. मात्र, त्यानंतर आलेल्या थंडी आणि कोरड्या हवामानामुळे मोहर येण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. कमी आद्रता व थंड वातावरण यामुळे मोहर धरायला अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणच्या आंबाबागेत मोहर स्पष्टपणे दिसून येत आहे. तर, काही बागांमध्ये जानेवारीच्या सुरुवातीला बरसलेल्या पावसात मोहोर काळवंडून गेला. डिसेंबर अखेर व जानेवारीत थंडी वाढल्याने मोहर धरण्यास वातावरण अनुकूल झाल्याने, काही आंबा बागांमध्ये मोहर चांगलाच पकडला आहे.

उरण तालुक्यातील वाढते औद्योगीकरण पाहता आमराईंची संख्या पूर्वीपेक्षा कमी झाली आहे. परंतु, चिरनेर, कळंबुसरे, नागाव, केगाव, कोप्रोली, पाणदिवे, भोम, सारडे, वशेणी, पिरकोन, पाले, विंधणे, दिघोडे, कंठवली यांच्यासह तालुक्यातील अन्य गावांमध्ये समाधानकारक आंब्याचे पीक आल्याचे पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांनी शेताच्या बांधावर माळरानात हापूस, केशर, रत्ना, राजापुरी, पायरी, चोथापुरी, दशहरी अशा सुधारित जातींची झाडे लावली आहेत. त्यामुळे कमी वेळेत मोठ्या प्रमाणात फळे येतात. त्यामुळे नवीन आंब्याच्या कलमांमुळे कमी जागेत जास्त फळे येताना दिसत आहेत.

> ऊन, वारा अशा समतोल वातावरणामुळे उरण परिसरात मोठ्या प्रमाणात आंब्यांना मोहोर आला आहे. काही ठिकाणी आंबे देखील आले आहेत. सध्याचे वातावरण आंबा शेवगा पिकाला अत्यंत उपयुक्त असल्यामुळे उरण परिसरात आंब्याचे चांगले पीक आले आहे. अजून मोहर बाहेर येत आहे. त्यामुळे आंबा बागायतदारांनी कीटकनाशक फवारणी करणे आवश्यक आहे.
>
> – अस्मित ठाकूर, शेतकरी

> तुडतुड्यांनी सोडलेल्या चिकट पदार्थामुळे काही आंबा बागांमध्ये काळी बुरशी आंब्याच्या मोहराला पकडली आहे. त्यासाठी झाडावर साध्या पाण्याने जोरात कारंजे मारून झाडावरील आंबा मोहोरावरील चिकटा धुवून घ्यावा. त्यानंतर बुरशीनाशक औषधांची फवारणी करावी. ही फवारणी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी करावी.
>
> – सुषमा गायकवाड, कृषी सहाय्यक अधिकारी, उरण



# शेलूत विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील ग्रामस्थांनी १९८४ मध्ये माघी गणेशोत्सव मंडळाची स्थापना केली. येथील श्री गणेश चौकात सलग ४४ वे वर्षी माघी गणेशोत्सव साजरा होत आहे. या मंडळाच्यावतीने स्थानिक तरुण आणि विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते आणि त्या स्पर्धेचा बक्षीस समारंभ मंडळाचे संस्थापक आणि मान्यवरांचे उपस्थितीत झाला.

शेलू येथील ग्रामस्थांनी सुरू केलेल्या माघी गणेशोत्सवाचे आयोजन गावातील श्री गणेश चौकात करण्यात आले. या पाच दिवसीय माघी गणेशोत्सवाचे निमित्ताने दैनंदिन कार्यक्रमाबरोबर भजनाचे कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या. मंडळाचे अध्यक्ष अनंता मसने तसेच ज्ञानेश्वर भगत, जितेंद्र सोनवले, गणेश गायकर, अरुण भगत, मंगेश बोराडे यांनी सदस्यांचे मदतीने केले आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने पनवेल येथील सुरेश पाटील यांनी हरीकीर्तन सादर केले. पखवाज सोलोवादन भाऊबुवा संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले. लुप्त होत असलेली भाऊड कला जोपासण्यासाठी भारुड कार्यक्रमाचे सादरीकरण बाळाजी शिरसाट यांनी केले. तसेच, स्थानिकांसाठी आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

# पोलिसांचा मानवी दृष्टीकोन अधोरेखीत

**| उरण | प्रतिनिधी |**

कौटुंबिक वादातून घर सोडून निघालेली महिला व तिचा मुलगा उरण बाजारपेठेत भरकटलेल्या अवस्थेत आढळून आल्याने एक हृदयस्पर्शी प्रकार समोर आला होता. मात्र, उरण पोलिसांच्या तत्परतेमुळे व 'ऑपरेशन मुस्कान' या मोहिमेमुळे ही घटना सुखद शेवटाकडे वळली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दि.२३ जानेवारी रोजी 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत उरण पोलीस गस्त घालत होते. त्यावेळी उरण बाजारपेठेत आशिया परवीन कलाम हुसेन (३२) व तिचा मुलगा फैजान कलाम हुसेन (१०) हे दोघे संशयास्पद व भरकटलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांना उरण पोलीस ठाण्यात आणून सखोल चौकशी करण्यात आली. या चौकशीत धक्कादायक वास्तव समोर आले. कौटुंबिक वादातून कोणालाही न सांगता ही महिला घर सोडून पती नोकरीनिमित्त बंगलोर येथे असल्याने त्यांच्याकडे जाण्याच्या उद्देशाने निघाली होती. मात्र, चुकीची ट्रेन पकडल्याने ती थेट उरणमध्ये येऊन भरकटली. बंगलोर येथे कामानिमित्त असलेले कलाम हुसेन वजीर हुसेन यांना घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर मिसिंग प्रकरणातील महिलेसाठी तिचा भाऊ गया सुदिन आयूब अली अन्सारी हा उरण पोलीस ठाण्यात दाखल होऊन दोघांनाही त्याच्या ताब्यात सुरक्षितरित्या देण्यात आले. या संपूर्ण प्रकरणात उरण पोलिसांची संवेदनशीलता, सतर्कता आणि मानवी दृष्टिकोन पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

## परिवर्तन विकास आघाडीचा प्रचार सुरु

**| कर्जत | प्रतिनिधी |**

तालुक्यातील मोठे वेणगाव जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी व शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष प्रणित कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराला सोमजाई देवीचे दर्शन घेऊन सुरूवात करण्यात आली आहे. रविवारी (दि.२५) सकाळच्या सुमारास राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे व शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उत्तर रायगड उपजिल्हाध्यक्ष नितिन सावंत यांच्या उपस्थितीत प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. यावेळी शेकापचे विलास थोरवे, बंधू पाटील, मधुकर घारे, भगवान भोईर आणि आघाडीतील घटक पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हळदीकुंकूतून अंधश्रद्धा निर्मूलनाचा जागर

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

खारपाडा येथे अन्वी व मायरा घरत यांच्या बोरन्हाण कार्यक्रमानिमित्त नुकताच हळदी-कुंकू सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र, हा कार्यक्रम केवळ एक धार्मिक विधी न ठरता, सामाजिक परिवर्तनाचा एक नवा वस्तुपाठ ठरला आहे. पारंपरिक चौकटी मोडीत काढत या कार्यक्रमात विधवा व विभक्त महिलांना प्रथम प्राधान्य देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, चमत्कारामागील विज्ञान उपक्रम घेण्यात आला. त्यामुळे या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदेश गायकवाड यांचे प्रबोधनात्मक सत्र या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले. त्यांनी 'स्त्रिया आणि अंधश्रद्धा' या विषयावर महिलांशी संवाद साधला. केवळ भाषणावर न थांबता गायकवाड यांनी प्रत्यक्ष चमत्कार सादरीकरण प्रयोग करून दाखवले. पाण्याने दिवा पेटवणे, हवेतून वस्तू काढणे, लिंबातून रक्त काढणे, पेटता कापूर हातावर ठेवणे यांसारख्या तथाकथित चमत्कारांमागे कोणते विज्ञान दडलेले असते, हे त्यांनी प्रयोगांद्वारे सिद्ध केले. तसेच, भोंदू बाबांच्या थापांना बळी न पडता महिलांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या माधुरी घरत, मालती म्हात्रे, भीमाबाई घरत व निर्मला कृष्णा ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. हा संपूर्ण उपक्रम रमाकांत घरत व त्यांच्या संपूर्ण घरत कुटुंबाने यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

### सामाजिक विषमतेवर घरत कुटुंबियांचा प्रहार

घरत कुटुंबियांनी एक धाडसी व विधायक पाऊल उचलले आहे. समाजात अनेकदा विधवा किंवा विभक्त महिलांना शुभ कार्यात दुय्यम स्थान दिले जाते. मात्र, या अनिष्ट प्रथेला छेद देत अशा महिलांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.
महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला. अशा उपक्रमांमुळे आमचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होते, अशी भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

## पान १ वरून

### जिल्ह्यात ३६,५२८ दुबार मतदार

पडताळणी करून एकाच मतदारसंघात एकाच केंद्रावर त्यांनी मतदान करावे, यासाठी यंत्रणा राबवण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. यादी त्या-त्या भागातील बीएलओंना दिली जाईल. बीएलओ गृहभेटीद्वारे मतदारांची पडताळणी करतील. त्यांना कोणत्याही एका मतदार संघातील, एका केंद्रावर मतदान करता येईल. तो मतदारसंघ आणि केंद्र कोणता असेल याची निवड मतदाराने करायची आहे. त्यानुसार मतदाराकडून तसा अर्ज भरून घेण्यात येणार आहे.

### सलगच्या सुट्ट्यांमुळे मुरूडची कोंडी

मुरूडमधील लोकसंख्या चार पटीने वाढते. त्यामुळे येथील बाजारपेठ व मासळीमार्केट रस्ता वाहतुक कोंडीत सापडतो. त्यामुळे या सर्वांचे नियोजन कोणी करायचे? असा प्रश्न सर्वांना पडत आहे.

या समस्येबाबत मुरुड नगरपरिषद नियोजन करून अंमलबजावणीसाठी पोलिसांना विनंती करते. दरम्यान, परिषदेने बाजारत वनवे केले, सम विषम तारखांना पार्किंगचे नियोजन केले. याबाबत नागराध्यक्षांच्या हस्ते त्या ठिकाणी फलक देखील लावण्यात आले. परंतु, परिस्थती जैसे थेच आहे. बाजारात वाहने चुकीच्या पद्धतीने लावली जातात. त्यामुळे रस्ते जाम होतात. त्यामुळे पोलिसांनी कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. परंतु, त्यासाठी पोलिसांकडे अतिरिक्त कर्मचारी नसल्याने ते नियोजन देखील फसले जात आहे.

**पोलिसांनी पुढाकार घेणे गरजेचे**

मुरुड शहरातील रेस्टोरंट व हॉटेल व्यवसायिकांनी आपल्याकडे येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनासांठी स्वतंत्र पार्कींग सुविधा करणे गरजेचे आहे. अन्यथा सुरक्षा रक्षक नेमून नियोजन करावे. दर रविवारी समुद्रकिनारी व बाजारातील रस्ते वन वे करण्यात यावेत. रहदारीच्या रस्त्यावरील दुकानदारांनी दुकानातील सामान रस्त्यावर लावू नये. याबाबतचे सर्व नियोजन नगरपरिषद व पोलिसांनी पुढाकार घेऊन करणे गरजेचे आहे.

### पद्म पुरस्कारांची घोषणा

पियुष पांडे, एस.के.एम. मैलानंदन, शतावधानी आर. गणेश, उदय कोटक, व्ही.के. मल्होत्रा, वेल्लापल्ली नटेसन, विजय अमृतराज, शिबू सोरेन यांना पद्मभूषण पुरस्कार जाहिर झाला आहे. तसेच, देशातील विविध राज्यांतील एकूण ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहिर झाला आहे.

### बेलकडे फाट्यावरील फलक उघडेच

हा दावा फेल ठरत असल्याचे समोर आले आहे. अलिबाग-आक्षी मार्गावरील बेलकडे फाटा येथे भूमीपुजनाचे फलक लावण्यात आले आहे. आमदार दळवी यांच्या नावाचे ते फलक आहे. मात्र, हे फलक झाकून ठेवण्यास प्रशासन उदासीन ठरल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे प्रशासन याकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करतेय का, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

### उरण शहरात कुत्र्यांची दहशत

परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, संबंधित कुत्रा पिसाळलेला असण्याची दाट शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, याच ठिकाणी जर एखादे लहान मूल किंवा महिला असती, तर मोठा अनर्थ घडला असता.

दरम्यान, उरण नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनासाठी लाखो रुपयांचा खर्च करून ठेकेदार कंपन्यांना काम दिले आहे. तरी प्रत्यक्षात शहरात कचऱ्याचे नियमित संकलन होत नसल्याचे वास्तव वारंवार समोर येत आहे. काही भागांत चारचार दिवस कचरा उचलला जात नाही, तर काही ठिकाणी महिनाभर कचरा तसाच पडून असल्याचे विदारक चित्र नागरिकांना पाहावे लागत आहे. या गंभीर परिस्थितीबाबत स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी केल्या असून, पत्रकारांनीही या प्रश्नावर वारंवार वृत्तपत्रांतून ठळक बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत. मात्र, या सर्व तक्रारी आणि बातम्यांकडे आरोग्य विभागाने सपशेल दुर्लक्ष करून ठेकेदारांना हेतूपुरस्सर पाठीशी घातले जात असल्याचा आरोप संतप्त नागरिकांकडून होत आहे.

### अलिबाग पेणमधील ठेकेदारांचे दोन कोटी थकले

मंडप, इलेक्ट्रीक तसेच साऊंड सिस्टीमसाठी वेंडरची नियुक्ती करण्यात आली होती. उमेदवारी अर्ज भरण्यापासून मतमोजणीसाठी लागणारे साहित्य व मंडप व इतर व्यवस्था, व्हीडीओग्राफी आदी कामे वेंडरमार्फत करण्यात आली होती. रात्रीचा दिवस करून यांनी काम केले. यावेळी अनेक तरुणांना रोजगाराचे साधन मिळाले. ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडली. पोलिसांनीदेखील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत काम केले. जीवाची पर्वा न करता, मोठ्या सुरक्षेमध्ये निवडणुकीची साहित्य ने-आण करण्याचे काम केले. ही निवडणूक होऊन तीन महिने होत आली आहेत. मात्र, अजूनपर्यंत वेंडरची थकीत बिले निवडणूक विभागाकडून देण्यात आली नसल्याची माहिती समोर आली आहेत. त्यामध्ये काही कर्मचारीदेखील भत्त्यापासून वंचित राहिले असल्याची चर्चा सुरु आहे.

सुमारे २ कोटी रुपयांचे बिल अद्याप दिले नाही, असा आरोप होत आहे. फक्त आश्वासने दिली जातात. प्रत्यक्षात मात्र कामांचा मोबदला निवडणूक विभागाकडून देण्यात आला नाही. विधानसभेची निवडणूक उदारीवर झाल्याचा फटका वेंडरला मोठ्या प्रमाणात बसला आहे. लाखो, करोडो रुपयांची बिले प्रलंबित असल्याने त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या तरुणांना मोबदला देणेदेखील कठीण झाले आहे. त्यामुळे ही मंडळीदेखील मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहेत.

मोठा गाजावाजा करीत निवडणूक प्रक्रीया सुरळीत पार पाडण्यात आली. परंतु, ज्या मंडळींनी सुविधा उपलब्ध केली, त्यांनाच अद्याप त्यांचा मोबादला देण्यास निवडणूक विभाग उदासीन ठरल्याची माहिती समोर येत आहे.

निवडणुकीसाठी फक्त ५० टक्के निधी आला होता. त्यामुळे अनेक कामांची बिले थकीत राहिली आहेत. काही वेंडरचे बिल देण्यात आले आहे. काहींचे राहिले आहे. मार्चअखेरपर्यंत निधी आल्यावर थकीत बिले देण्यात येतील.असे नितीन वाघमारे यांनी सांगितले.

### डेब्रिज टाकणाऱ्या डंपरवर कारवाई

त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर सिडकोच्या पथकाने उरण पोलिसांच्या मदतीने ७ डंपर जप्त करून धीरज सरोज, विमलेशकुमार मदन, राजदेव लोधीया, जगदीश त्रिपाठी, मोहम्मद अकील हुसेन सय्यद, जियारहमान हाझीम अन्सारी आणि मोहम्मद यासीन नबी रहेम खान या डंपरचालकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रिज टाकत असताना नागरिकांना कोणी आढळल्यास त्यांनी त्वरित सिडकोच्या संकेतस्थळावर किंवा संबंधित पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन सिडकोने केले आहे.

### खासगी व्हिडीओवरून दोघींचे भांडण

प्रचंड वाद झाले असून पीडित महिलेने दादर सागरी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. याबाबत पोलिसांनी संबंधित महिलेवर गुन्हा दाखल केला असून अधिकचा तपास दादर सागरी पोलीस निरिक्षक संजयकुमार ब्राम्हणे हे करत आहेत.

## बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

शिवसेनाप्रमुख आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंची शुक्रवारी (दि.२३) सर्वत्र जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुरूड-जंजिरा नगरपरिषद कार्यालयात त्यांच्या १०० व्या जयंती निमित्त आदरांजली वाहण्यात आली. यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे हे विचार, एक धगधगती ज्वाला आणि मराठी माणसाच्या हक्कासाठी उभे राहणारे अशी ओळख असुन सामान्य माणसाला आणि समाजाला दिशा देणारा विचार, स्पष्टवक्तेपणा, निर्भीड भूमिका आणि मराठी माणसाच्या हक्कासाठी उभ्या ठाकण्याची ताकद होती, असे त्यांनी सांगितले.

# अर्ज मागे घेण्यासाठी मुंबई पॅटर्न?

## अपक्ष, डमी उमेदवारांना तडजोडीतून मोठ्या अपेक्षा

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

तालुक्यातील उमेदवार अर्ज दाखल करण्याच्या दिवसापर्यंत ज्यांनी हिरीरीने नामनिर्देशनपत्र दाखल केली त्या उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा 'मुंबई पॅटर्न' कधी सुरू होतोय, अशी अपेक्षा वाढीस लागली आहे. यामध्ये अपक्ष तसेच डमी उमेदवारांनाही 'काही तरी द्या'ची लागण झाली असून उमेदवारांना तडजोडीतून मोठ्या अपेक्षा असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यात पंचायत समितीच्या ४ गणांसाठी २४ तर जिल्हा परिषदेच्या २ गटांसाठी ११ नामनिर्देशनपत्र दाखल झाली आहेत. त्यात दोन्ही राष्ट्रवादी व शिवसेना गट, काँग्रेस, शेकाप, भाजप, मनसे, जनता दल सेक्युलरचे उमेदवार रिंगणात आहेत. छाननीवेळी माटवण गणातील एका नामाप्र महिला उमेदवाराचा अर्ज बाद झाल्यानंतर ही संख्या पोलादपूर तालुक्यात पंचायत समितीच्या चार गणांसाठी २३ तर जिल्हा परिषदेच्या २ गटांसाठी ११ नामनिर्देशनपत्र दाखल झाली असून लोहारे जि.प. सर्वसाधारण गटामध्ये एकूण ८ उमेदवार, कापडे बुद्रुक जि.प.नामाप्र गटामध्ये ३ उमेदवार, माटवण येथे नामाप्र महिला पंचायत समिती गणामध्ये एकूण ३ उमेदवार, कापडे बुद्रुक सर्वसाधारण गणामध्ये एकूण ८ उमेदवार, लोहारे सर्वसाधारण महिला गणामध्ये ५ उमेदवार, कोतवाल बुद्रुक सर्वसाधारण गणामध्ये एकूण ७ उमेदवारांचे नाम निर्देशन पत्र अशी दिसून आली. त्यामुळे पोलादपूर तालुक्यात सर्व पक्षांचे स्वतंत्र उमेदवारांचे एकला चलोची भुमिका दिसून आली.

दरम्यान, गेल्या दोन दिवस प्रचारादरम्यान एका गावातील बापलेक उमेदवारांच्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण झाल्याने 'मुंबई पॅटर्न'ची पुनरावृत्ती होण्याची चिन्हे असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे डमी आणि काही अपक्ष उमेदवारांनादेखील 'काही तरी द्या'ची लागण झाली असून त्यांनी येत्या काळात पाठिंबा देण्यासाठी समाधानाने उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तयारी केली असल्याचे बोलले जात आहे.

# सलगच्या सुट्ट्यांमुळे श्रीवर्धनला पर्यटकांची तोबा गर्दी

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

शनिवार- रविवारच्या सुट्ट्यांना प्रजासत्ताक दिन जोडून आल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी पर्यटकांचा मोठा ओघ वाढत आहे. 'लाँग विकेंड'चा आनंद घेण्यासाठी त्या परिसरातील हॉटेल्स, खासगी बंगले आणि रिसॉर्ट्सचे बुकिंग आतापासूनच 'हाऊसफुल्ल' होऊ लागले आहेत. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



नाताळ व नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. आता दहावी आणि बारावीच्या परीक्षा तोंडावर असूनही हरेश्वर, श्रीवर्धन आणि आदगाव समुद्रकिनारी पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. गुलाबी थंडीचा आनंद घेत पर्यटक निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवत आहेत. स्थानिक हॉटेल्स, लॉज आणि रिसॉर्ट्स ७० ते ८० टक्के फुल्ल झाली असून, बाजारपेठेतही मोठी आर्थिक उलाढाल होत आहे.

हरिहरेश्वर श्रीवर्धन दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर गेली अनेक वर्षे राज्यभरातील पर्यटक हजेरी लावतात. काहीवेळा समुद्रात आनंद लुटत असतात तर काही पर्यटक साहसी क्रीडा प्रकारांचा आनंद घेत असतात. अनेकवेळा पर्यटक समुद्रात बुडल्याच्या घटना घडल्या की शासकीय यंत्रणा खडबडून जागी होते. परंतु, पर्यटकांच्या सुरक्षेविषयी कोणतीही ठोस उपाययोजना करताना आढळून येत नाही. याबाबत पर्यटकांमध्ये नाराजीचा सूर दिसतो.

**जाहीर नोटीस**

मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दि. १२/११/२०२५ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावास मान्यता मिळालेली असल्यामुळे खालील सहकारी संस्थांची सन २०२५-२०२६ ते २०३०-३१ या कालावधीकरीता निवडणूक कार्यक्रम दि. २७/०१/२०२६ रोजी संस्थेचे नोटीस बोर्ड व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यात येत आहे. नामनिर्देश अर्ज विक्री व स्विकृती तसेच नामनिर्देशन पत्राची छाननी व नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे ठिकाण हे मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड. पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार भवन, यार्ड दहिवली तर्फे निड, कर्जत, जि. रायगड आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव व पद | नामनिर्देशन पत्रे वाटप व स्विकृती करण्यासाठी तारीख, वेळ | नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे दिवस | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप दिनांक | मतदान दिनांक, वेळ व स्थळ | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ व निकाल जाहीर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आनंदवन कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्या, हंबरपाडा, दहिवली नेरळ, ता. कर्जत जि. रायगड | श्री. अंकुश शिंदे लेखापरिक्षक (श्रेणी-२) सहकारी संस्था कर्जत तालुका | दि. २७/०१/२०२६ ते दि. ३०/०१/२०२६ आणि दि. ०२/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि. ०३/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि. ०४/०२/२०२६ ते दि. १८/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत | दि. १९/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि. ०१/०३/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत, संस्थेच्या आवारात | दि. ०१/०३/२०२६ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने व मतमोजणी संपेपर्यंत व निकाल जाहीर मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |

सही/
(अंकुश शिंदे)
निवडणूक निर्णय अधिकारी

सही/-
(शिवाजी बा. घुले)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
कर्जत तालुका, जि. रायगड

राजकीय फेरफटका

# आमदारांच्या गावातील ‘विकास’ उघडकीस

**थळकरांचा संताप उसळणार, फलकांवरचा विकास संपणार**

## एमआयडीसीच्या रस्त्याची अवस्था बिकट

एमआयडीसीचा रस्ता अद्याप ही खराब आहे. या रस्त्याची अवस्था बिकट आहे.ठिकठिकाणी खड्डयांचे साम्राज्य आहे. त्यामुळे अनेक वेळा रस्त्यावरून खड्डे चुकविताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. याच रस्त्याच्या बाजूला नळ योजनेसाठी खोदकाम करण्यात आले आहे. मात्र हे कामदेखील अपूरेच आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. करोडो रुपयांचा निधी आणल्याचा दावा करणाऱ्या आमदारांचे स्वतःच्या गावांच्या विकासाकडेच दुर्लक्ष असल्याची चर्चा आहे.



## थळमधील अनेक योजना अपूर्ण

पूर्वी थळ जिल्हा परिषद मतदार संघ होता. या मतदार संघातून आमदार दळवीदेखील निवडून आले आहेत. मात्र या गावांचा विकास पाहिजे तसा झाला नसल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. आमदार दळवी यांचे गावातील रस्ते आजही खडतर आहेत. सायमन कॉलनीकडे जाणारा रस्त्याची दुरुस्ती दरवर्षी केली जाते. मात्र आजही हा रस्ता खडतर आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खडड्यातून नागरिकांना प्रवास करावा लागत आहे. स्वतःच्या गावातील पाण्याची योजना अजूनही अपूरीच आहे. मात्र तक्रार करणाऱ्यांवर दहशत निर्माण करण्याचे काम केले जात आहे, अशी चर्चा आहे. थळमधील पाण्याचे टँकर पूर्णतः खराब झाले आहेत. अनेक योजना अपूर्णच आहेत. त्याच नाहक त्रास सर्वसामान्याना होत आहे थळ परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचा ढिगारा साचला आहे त्यामुळे आरोग्याचा ही प्रश्न गंभीर झाल्याची चर्चा आहे.

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

थळ जिल्हा परिषद मतदारसंघात निवडणूक जवळ येत असताना सत्ताधारी गटाकडून विकासाचे ढोल जोरात वाजवले जात आहेत. फलक, बॅनर, उद्घाटनांचे फोटो आणि कोट्यवधींच्या निधीच्या घोषणा यांचा पाऊस पडतो आहे. मात्र या गोंगाटाच्या आड थळची जनता एकच प्रश्न विचारत आहे, हा विकास नेमका कुणासाठी? आमदारांच्या गावात अर्थात थळ जिल्हा परिषद मतदारसंघात विकास झाला, असे जर कुणी आजही छातीठोकपणे सांगत असेल, तर तो निव्वळ असत्याचा निर्लज्ज प्रचार आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला, कामे कागदावर पूर्ण झाली, उद्घाटनांचे नारळ फुटले; पण थळमधील गावागावात फिरले की एकच प्रश्न उभा राहतो तो म्हणजे विकास नेमका कुठे आहे? रस्ते अजूनही चिखलात, पाणी अजूनही टँकरवर, आरोग्य सुविधा अजूनही तोकड्या आणि शिक्षण व्यवस्था अजूनही दुर्लक्षित. मग हा विकास जनतेसाठी आहे की काही निवडकांच्या खिशासाठी? हा विकास नव्हे, तर विकासाच्या नावाखाली केलेली निर्लज्ज थट्टा आहे.

थळचा विचार केला तर विकासकामांचा दर्जा इतका सुमार आहे की पहिल्याच पावसात कामांचे खरे स्वरूप उघडे पडले. निकृष्ट साहित्य, अपूर्ण प्रकल्प आणि निधीची संशयास्पद उधळपट्टी हे सगळे उघड दिसत असतानाही प्रशासन गप्प का आहे? की प्रशासनालाही या लुटीत भागीदार केले गेले आहे? तक्रारी दाखल होतात, पण चौकशी फक्त फाइलमध्येच होते. दोषी मोकाट, आणि नागरिक मात्र त्रस्त हेच थळचे आजचे वास्तव आहे. थळ जिल्हा परिषद मतदारसंघात प्रश्नांची यादी संपत नाही. पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार, असे अनेक प्रश्न आ वाचून उभे आहेत. पण सत्ताधाऱ्यांकडे उत्तरांची कमतरता आहे. निधी कुठे गेला, कामे कुणाच्या फायद्यासाठी झाली, आणि जनतेला नेमके काय मिळाले याचे उत्तर कोण देणार?

राजकीय फेरफटका या सदरामध्ये थळ जिल्हा परिषद मतदारसंघातील विकासाच्या नावाखाली सुरू असलेली फसवणूक, प्रशासनाची मूक संमती आणि लोकप्रतिनिधींचे अपयश उघड करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण यावेळी निवडणूक केवळ उशेदवारांची नाही तर ती थळच्या जनतेच्या संयमाची आणि सत्ताधाऱ्यांच्या पापांची आहे. फलकांवरचा विकास पुरे झाला; आता मतपेटीतून त्याचा अंतिम निकाल लागणार आहे. या मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे सानिका सुरेश घरत तर शिंदे गटाकडून मानसी दळवी यांच्यात लढत होणार आहे. सुशिक्षित आणि निष्कलंक चेहरा म्हणून सानिकाचे पारडे जड असल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. तर शिवीगाळ करणाऱ्या, अधिकाऱ्यांवरही हात उचलणाऱ्या मानसी दळवी यांच्या हुकूमशाहीला जनता त्रस्त असल्याचेही बोलले जात आहे.

या पार्श्वभूमीवर थळची निवडणूक ही केवळ दोन उमेदवारांमधील लढत राहिलेली नाही. ती सत्तेच्या माजाविरुद्ध जनतेच्या संयमाची परीक्षा बनली आहे. फलकांवर दाखवलेला विकास आता पुरे झाला. जनता आता प्रत्यक्ष आयुष्यातील विकासाचा हिशेब मागत आहे. महाविकास आघाडीकडून सानिका सुरेश घरत आणि शिंदे गटाकडून मानसी दळवी यांच्यात ही लढत होणार आहे. सुशिक्षित, निष्कलंक आणि अभ्यासू चेहरा म्हणून सानिका घरत यांना पाहिले जात आहे. तर दुसरीकडे शिवीगाळ, अधिकाऱ्यांवर दबाव, वादग्रस्त वर्तन आणि हुकूमशाही कारभारामुळे जनतेत मानसी दळवीविरोधात अस्वस्थता वाढल्याचे चित्र आहे. आता फलकांवरचा विकास लवकरच संपेल. मतपेटीतून निश्चितच चांगले उत्तर मिळेल, आणि ते उत्तर स्फोटक असेल, याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी आणि जिल्हा परिषद सदस्या मानसी दळवी यांच्या कार्यकाळात थळ जिल्हा परिषद मतदारसंघ कायम दुर्लक्षित राहिल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. मागील अनेक वर्षांपासून विकासाच्या नावावर केवळ आश्वासनांची पुनरावृत्ती झाली असून प्रत्यक्षात मात्र मतदारसंघात मूलभूत सुविधांचा अभाव कायम असल्याची भावना जनतेत तीव्र होत चालली आहे. थळ परिसराची लोकसंख्या सातत्याने वाढत असताना रोजगाराच्या संधी मात्र निर्माण झालेल्या नाहीत. स्थानिक तरुणांसाठी उद्योग, प्रशिक्षण किंवा रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. शुद्ध आणि मुबलक पाण्याची सोय आजही अनेक गावांमध्ये नाही. उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून ही समस्या वारंवार मांडूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याच्या तक्रारी आहेत. रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला आहे.स्थानिक नागरिकांचे आरोप आहेत की, जमिनीच्या व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात अपहार झाले आहेत. बलाढ्य अशा आरसीएफ कंपनीतही भूमिपुत्रांना डावलून बाहेरच्यांना प्राधान्य देण्यात आले. पर्यटन, शेती, मासेमारी अशा क्षेत्रांमध्ये स्थानिकांच्या हक्कांचे संरक्षण झालेले नाही. आमदार आणि जिल्हा परिषद सदस्या यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागले नाहीत, उलट लोकप्रतिनिधी भेटीगाठी टाळत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.
या समस्यांमुळे थळ जिल्हा परिषद मतदारसंघात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून आता केवळ शब्दांवर नव्हे तर प्रत्यक्ष काम करणारे नेतृत्व हवे, अशी ठाम भूमिका मतदारांकडून घेतली जात आहे. विकासापासून वंचित राहिलेल्या थळसाठी परिवर्तन अपरिहार्य असल्याची चर्चा मतदारसंघात जोर धरू लागली आहे.

# सत्तेच्या दहशतीला थेट आव्हान



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

थळ जिल्हा परिषद मतदारसंघातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाने जाहीर केलेली उमेदवारी ही सत्तेच्या माजाला आणि वर्षानुवर्षांच्या अपयशाला थेट आव्हान देणारी ठरत आहे. जनतेला गृहित धरून चाललेल्या राजकारणाविरुद्ध शेकापने शिक्षित, जबाबदार आणि जनतेशी नाळ जोडलेली उमेदवारी दिल्याने मतदारांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. थळ जिल्हा परिषदेसाठी कु. सानिका सुरेश घरत यांना उमेदवारी देण्यात आली असून, हा निर्णय केवळ उमेदवारी जाहीर करण्यापुरता मर्यादित नसून परिवर्तनाचा ठाम संदेश देणारा मानला जात आहे. शिक्षित, जागरूक आणि सामाजिक प्रश्नांची स्पष्ट जाण असलेली उमेदवार म्हणून सानिका घरत यांची ओळख आहे. सत्तेच्या दहशतीला न घाबरता थेट प्रश्न मांडण्याची तयारी आणि जनतेच्या हक्कांसाठी ठाम भूमिका घेण्याची क्षमता त्यांच्याकडे असल्याचे नागरिक सांगत आहेत. घरत कुटुंबाचा संघर्षाचा वारसा आणि जनतेशी असलेली नाळ या उमेदवारीला बळ देणारी ठरत आहे. थळ मतदारसंघातील पंचायत समितीसाठी जाहीर करण्यात आलेले उमेदवारही शिक्षित, प्रशासकीय समज असलेले आणि जबाबदारीची जाणीव ठेवणारे असल्याचे चित्र आहे. केवळ सत्ता मिळवण्यासाठी नव्हे तर विकासासाठी काम करण्याची तयारी असलेले, शाळा, पाणी, रोजगार, आरोग्य, क्रीडा आणि पर्यटन यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घेणारे उमेदवार शेकापने दिले असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. वर्षानुवर्षे सत्तेच्या जोरावर भीतीचं वातावरण निर्माण करून विकासापासून थळ मतदारसंघाला दूर ठेवण्यात आलं. रोजगार, शिक्षण, पर्यटन, क्रीडा आणि संस्कृती या प्रत्येक क्षेत्रात अपयश दिसून आलं. अशा पार्श्वभूमीवर शेकापची ही उमेदवारी म्हणजे दहशतीच्या राजकारणाविरोधातील थेट लढत असल्याचे बोलले जात आहे. एकूणच थळ जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी शेतकरी कामगार पक्षाने दिलेली उमेदवारी ही नावासाठी नाही तर कामासाठी असल्याचा ठाम संदेश देणारी आहे. त्यामुळे थळ मतदारसंघात शेकापच्या या निर्णयाकडे परिवर्तनाची सुरुवात म्हणून पाहिले जात असून, जनतेतून या उमेदवारीला मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.



# महापौरपद ओबीसीसाठी राखीव

## विकसित वसाहतींमधील नगरसेवकांना संधीची मागणी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल पालिकेचे महापौरपद यंदा सर्वसाधारण नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) यासाठी राखीव झाली आहे. त्यामुळे कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. अशातच पालिकेत समाविष्ठ जुन्या नगरपालिका क्षेत्रातील नगरसेवकांऐवजी इतर वसाहतीमधून निवडून आलेल्या नगरसेवकांना महापौरपदाची संधी देण्यात आली पाहिजे, अशी चर्चा परिसरातील मतदारांमध्ये आहे.

पनवेल महापालिकेच्या २०१७ सालच्या पहिल्याच निवडणुकी नंतर महापौरपद अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्याने डॉ. कविता चौतमोल यांना देण्यात आली होती. त्या नवीन पनवेल या पूर्वीच्या नगरपालिका क्षेत्रातील प्रभागातून निवडून आल्या होत्या. याच कालावधीत सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता म्हणून जवाबदारी सांभाळण्याची संधी केवळ जुन्या नगरपालिका क्षेत्रातील नगरसेवकांना देण्यात आली होती. त्यामुळे पालिकेत समाविष्ठ इतर वसाहतीमधून निवडून आलेल्या नगरसेवकांनवर अन्याय झाल्याची भावना नगरसेवकांमध्ये आहे. खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा तसेच पालिकेत समाविष्ट इतर ग्रामीण भागातुन निवडून आलेल्या नगरसेवकांना पालिकेत नेतृत्व करण्याची संधी मिळाल्यास त्या-त्या प्रभागातील प्रलंबित प्रश्न अधिक प्रभावीपणे सुटण्यास मदत होऊ शकते. सिडको हस्तांतरण प्रक्रियेत असलेल्या वसाहतींसाठी हे अधिक गरजेचे आहे. गेल्या पाच वर्षांत महापौर, सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेते ही सर्व महत्त्वाची पदे जुन्या नगरपालिका क्षेत्रातील नेत्यांकडेच राहिली. खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा यांसारख्या नोड्समधून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो, त्यामुळे त्या ठिकाणच्या लोकप्रतिनिधींनाही शहराच्या सर्वोच्च पदावर बसण्याची संधी मिळणे, त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्याचा मार्ग ठरू शकतो.

### प्रलंबित प्रश्नांची तातडीने सोडवणूक

ज्या भागाचा महापौर असतो, त्या भागातील समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष अधिक वेगाने जाते. विशेषतः पाणीपुरवठा. सिडको नोड्समधील पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर आहे. तसेच, हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्थानिक नगरसेवकाचा महापौर पदावर असणे फायदेशीर ठरेल व वाढत्या नागरीकरणानुसार पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यास गती मिळेल.

### सत्ताधारी पक्षाकडे निवडीसाठी आवाका

यंदा महापौरपद नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी राखीव झाल्याने, सत्ताधारी पक्षाकडे निवडीसाठी मोठा आवाका आहे. कळंबोली किंवा कामोठे यांसारख्या भागातून निवडून आलेल्या सक्षम ओबीसी नगरसेवकाला संधी देऊन सत्ताधिकारी समतोल राखण्याचा प्रयत्न करू शकतात. परंतु, वसाहतींमधील नगरसेवकांना डावलले गेले, तर आगामी निवडणुकांमध्ये मतदारांमध्ये नाराजी पसरू शकते. याउलट, खारघर किंवा कळंबोलीला नेतृत्व दिल्यास तिथल्या मतदारांचा विश्वास संपादन करणे सोपे जाईल.

## खोपोली नगरपालिकेचे खातेवाटप जाहीर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोलीतील एकूण १५ प्रभागात शिंदे गट १४, अजित पवार गट ७, अपक्ष १, भाजप ४, शेकाप ४, शरद पवार गट १ असे उमेदवार निवडून आले आहेत. यावेळी पहिल्याच वर्षी उपनराध्यक्षपद भाजपला दिले आहे. खोपोली नागपालिकेच्या नगराध्यक्षपदी कुलदीपक शेंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शुक्रवारी (दि.२३) सभापतीपदासाठी निवडणूक घेण्यात आली. विविध सभापती पदासाठीच्या निवडणूकिसाठी पिठासीन अधिकारी म्हणून मुख्याधिकारी पंकज पाटील होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम सभापती अनिल सानप (शिंदे गट), सार्वजनिक क्रीडा सांस्कृतिक कार्य समिती सभापती अमित काळे (शिंदे गट), स्वच्छता वैद्यक व आरोग्य समिती मयुरी शेलार (शिंदे गट), नियोजन व विकास समिती सभापती प्रतीक्षा रेटरेकर (भाजप), महिला व बालकल्याण समिती सभापती सुवर्णा मोरे (शरद पवार गट), परिवहन सभापती किशोर पाटील (भाजप), स्थायी समिती सदस्य संदीप पाटील, विनायक तेलवणे (अजित पवार गट) व हरीश काळे (शिंदे गट) यांची निवड करण्यात आली.

## जातीय राजकारणामुळे नाराजी

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी उमेदवारी अर्ज भरले असले तरी, ही उमेदवारी प्रक्रिया म्हणजे नव्या नेतृत्वाऐवजी शिळ्या कढीला ऊत आणण्याचा केविलवाणा प्रयत्न असल्याची चर्चा आहे.

चरईखुर्द जिल्हा परिषद गट सर्वसाधारण स्त्री जागेसाठी आरक्षित आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने माजी राजिप सदस्या गीता जाधव यांना पुन्हा संधी दिली आहे त्यांच्या समोर शिवसेनेने अस्मिता शिगवण, सुलभा काप यांचा उमेदवारी अर्ज भरला आहे. भाजपकडून हेमा मानकर, शेकापकडून करूणा पातेरे हे देखील मैदानात आहेत. ८६ चरईखुर्द पंचायत समिती गण सर्वसाधारण स्त्री साठी आरक्षित आहे. माजी सभापती अक्षरा कदम यांना राष्ट्रवादी काँग्रेसने येथून उमेदवारी दिली आहे. त्यांच्या समोर शिवसेनेने सुलभा काप, दिपाली महाडिक यांना उमेदवारी दिली आहे. गिरणे ग्रामपंचायत माजी सरपंच ज्योती पायगुडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे ८५ बोरघर हवेली पंचायत समिती गण सर्वसाधारण जागेसाठी आरक्षित आहे येथे कुणबी समाजाचे नेते रवींद्र मांडवकर, सुषमा कजबले यांना राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी दिली असून शिवसेनेकडुन अनंत खराडे, संतोष आमले तर शेकापकडून कानू विचारे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. ४४ रहाटाड जिल्हा परिषद गट नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री साठी आरक्षित असून येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नलिनी लोखंडे, शिवसेनेकडून रोहिणी पिंपळे, छाया कजबले तर सुप्रिया मोडक यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. ८७ रहाटाड पंचायत समिती गण अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असून येथे शिवसेनेकडून चंद्रकांत विठ्ठल मुकण, कविता विठोबा मुर्तुगे यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत राष्ट्रवादी काँग्रेसकडून नथुराम मुकण, देवका मुकण यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत याच पंचायत समिती गणातून निवडून गेलेला उमेदवार पंचायत समितीचा सभापती होणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी आणि शिवसेनेने या गणाकडे लक्ष केंद्रित केले आहे मांदाड पंचायत समिती गण नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री साठी आरक्षित असून शिवसेनेकडून रोशनी तांदळेकर तर राष्ट्रवादीकडून रुपाली तांडेल, पार्वती तांडेल यांनी उमेदवारी दाखल केले आहेत.



# भावी लढाईसाठी शुभेच्छा

आज देशाचा ७६ वा प्रजासत्ताकदिन. अगदी ब्रिटिशांच्या अमलात असतानाही भारतात थोड्या फार प्रमाणात लोकशाही अस्तित्वात आली होती. नगरपरिषदा वगैरे खूप पूर्वीच स्थापन झाल्या होत्या. १९३५ च्या कायद्याने विविध प्रांतांमध्ये काँग्रेसची सरकारे अस्तित्वात आली. त्यांना कायदे करण्याचे अधिकार मिळाले. नंतर १९४६ मध्ये देशात हंगामी सरकार अस्तित्वात आले. पण भारत हा सार्वभौम प्रजासत्ताक झाला नव्हता. त्याला स्वतःची अशी वेगळी राज्यघटना नव्हती. ती २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आली. या घटनेने सर्व नागरिकांना वागण्या बोलण्याचे, लिहिण्याचे स्वातंत्र्य मिळाले. एका झटक्यात सर्वांना मताधिकार मिळाला. एका कायद्याने देशातील अस्पृश्यता नष्ट झाली. त्यावेळपर्यंत तर सोडाच, पण पुढे १९६० च्या दशकापर्यंत अमेरिकेत काळे व गोरे हा भेद कायम होता. बसेस, शाळा, इस्पितळे इत्यादींमध्ये काळ्या लोकांसाठी वेगळ्या जागा असत. त्याविरुध्द काळ्या लोकांना खूप मोठी आंदोलने करावी लागली. पण गोऱ्या लोकांचा वर्णद्वेष थांबणारा नव्हता. पुढे तर काळ्यांचा नेता मार्टिन ल्यूथर किंगची हत्या झाली. आफ्रिकेतील काळ्या-गोऱ्यांचा भेदभाव संपायला १९९० चे दशक उजाडावे लागले. तिथल्या गोऱ्या शेतकरी व श्रीमंतांना अमेरिका व इंग्लंडमधल्या विद्वेषी गोऱ्यांचाच पाठिंबा होता. त्या पार्श्वभूमीवर भारतासारख्या मागास व गरीब देशाने १९५० मध्ये एका कायद्याच्या तरतुदीने हजारो वर्षांपासून चालत आलेली अस्पृश्यता नष्ट करून टाकली हे विलक्षण म्हणावे लागेल. प्रत्यक्ष समाजातील अस्पृश्यता वा दलितांबद्दल हीनत्वाची भावना आजही गेलेली नाही. पण कायद्याने तो गुन्हा आहे याबाबत भारतात कोणालाही शंका नाही. उलट अमेरिकेत काळ्या लोकांबद्दल उघड विद्वेष पसरवणारे लोक आजही मौजूद आहेत. भारत प्रजासत्ताक झाल्यामुळे एका व्यक्तीला एक मत ही व्यवस्थाही एका झटक्यात व विनातक्रार अस्तित्वात आली. तेव्हा हिंदुत्ववाद्यांचे राज्य आले असते तर कदाचित आरंभीच हे हिंदुराष्ट्र आहे अशी घोषणा झाली असती व मुस्लिमांना जीव नकोसा केला गेला असता. पण सुदैवाने तेव्हाची जनता शहाणी होती. नेहरु, गांधी, बाबासाहेब आंबेडकर हेच तिला आपले आदर्श नेते वाटत होते. त्या जनतेनेच या देशाला योग्य मार्गावर ठेवले.

### बाबासाहेबांची दूरदृष्टी

गेल्या ७५ वर्षांमध्ये या देशाने अनेक चांगल्या गोष्टी निर्माण केल्या किंवा नंतर कमावल्या आहेत. आरंभापासून हा देश शेतीवर अवलंबून होता. पण आपले उत्पादन सुधारत नव्हते. मग हरित क्रांती झाली. आता तेलबिया व काही प्रमाणात डाळी वगळता सर्व अन्नधान्ये, फळे, दूध इत्यादींबाबत आपण पूर्णपणे स्वायत्त व स्वतंत्र आहोत. सध्या आपले मका, सोयाबीन व दूध भारताने घ्यावे म्हणून अमेरिकेचा ट्रम्प आपल्या मागे लागला आहे. पण अजून तरी आपण हा दबाव मान्य केलेला नाही. आपले औद्योगिक उत्पादन मात्र त्या प्रमाणात वाढले नाही. त्यातून आपल्याकडे बेकारीची समस्या वाढली. या बेकारीनेच हिंदुत्वाच्या खोट्या प्रचाराला मनुष्यबळ पुरवले. अनेक बेकार तरुण कार्यकर्ता नावाचा व्यवसाय करू लागले. काही जण गोहत्या प्रतिबंधक दलाच्या निमित्ताने स्वतःचे स्वतच पोलिसगिरीही करू लागले आहेत. मात्र यातून समाजाचे भले होत नसून निव्वळ विद्वेषाचे उत्पादन वाढते आहे. हे उद्योग बंद होऊन खऱ्या उद्योगधंद्यांना चालना मिळावी अशी आशा आजच्या प्रजासत्ताकदिनी करूया. राज्यघटनेचा मसुदा बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिला. पण त्यांनीच त्या घटनेच्या मर्यादाही तेव्हा सांगून ठेवल्या होत्या. आपण समता, बंधुता वगैरे हक्क कागदावरच्या घटनेतून सर्वांना दिले आहेत. पण आर्थिक बदल झाले नाहीत तर हे हक्क प्रत्यक्षात येऊ शकणार नाहीत हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. शिवाय, सत्तेतले सरकार, नोकरशाही व न्यायालये हे आपापली जबाबदारी कशी पार पाडतात यावरच या अधिकारांची कशी अंमलबजावणी होणे अवलंबून आहे हेही त्यांच्या लक्षात आले होते. बाबासाहेब किती दूरदर्शी होते हे त्यावरून दिसते. कारण आज घटनेतील अनेक स्वातंत्र्ये केवळ कागदावरच आहेत. सरकारवर टीका करणे म्हणजे देशद्रोह अशी नवी व्याख्या प्रसृत होऊ लागली आहे. अलिकडेच डॉ. संग्राम पाटील यांना त्यांच्या फेसबुकवरील पोस्टचे निमित्त करून इंग्लंडला जाण्यापासून रोखण्यात आले. शेवटी त्यांना उच्च न्यायालयात जावे लागले. डॉ. पाटील हे मूळचे जळगावचे असले तरी आता ब्रिटीश नागरिक आहेत. मोदी सरकारच्या धोरणांवर ते अनेकदा टीका करीत असतात. त्याचा सूड म्हणून भाजपच्या एका कार्यकर्त्याने दाखल केलेल्या तक्रारीचा आधार घेऊन पाटील यांना चौकशीसाठी अडकवून ठेवण्यात आले आहे.

### गोगावलेंच्या फरारींचा निर्ल्लज्जपणा

याच काळात भरत गोगावले यांचे चिरंजीव व पुतणे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल होऊनही पोलिसांना ते सापडत नव्हते. पोलिसांनी फरार म्हणून घोषित करूनही ते भरतशेटच्या मात्र संपर्कात होते व भरतशेटही बिनदिक्कत तसे सांगत होते. एक आरोपी तर नवी मुंबईतला व्यवहार करण्यासाठी नोटरीपुढे सही करायलाही येऊन गेल्याची नोंद होती. हा निर्ल्लज्जपणा दोन महिन्यांपासून खुलेआम सुरू होता. शेवटी उच्च न्यायालयाला यात हस्तक्षेप करावा लागला. मुख्यमंत्र्यांचे आपल्या मंत्र्यांवर व कारभारावर नियंत्रण नाही काय असा सवाल न्यायमूर्तींनी केला. तेव्हा कुठे हे फरार आरोपी पोलिसांपुढे हजर झाले. म्हणजे जी गोष्ट महाड पोलिसांच्या पातळीवर रुटीनमध्ये व्हायला हवी होती ती करून घेण्यासाठी लोकांना उच्च न्यायालयापर्यंत जावे लागले. असेच शेकडो प्रसंग रोज घडत असतात. यातून लोकांचा लोकशाहीवरचा व राज्यघटनेवरचा विश्वास कमी होत चालला आहे. भारत नावाच्या प्रजासत्ताकासाठी ही धोक्याची घटना आहे. लोकशाही म्हणजे बहुसंख्यांकांनी दादागिरीच्या जोरावर केलेला कारभार असे स्वरुप आपल्या देशाला येत चालले आहे. हे धोकादायक आहे. कोणीही मागणी केलेली नसताना शक्तीपीठसारखे घातक प्रकल्प पुढे रेटणे, धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली अदानी बिल्डरला मुंबईतील मोक्याच्या मिठागरांच्या व संजय गांधी उद्यानाच्या जागा देणे, लोटे औद्योगिक वसाहतीत छुप्या रीतीने घातक विषारी रसायने करणाऱ्या एका इटालियन कंपनीला परवानगी देणे, गडचिरोलीत विकासाच्या नावाखाली जंगल व आदिवासींची शेती तसेच जगणे उद्ध्वस्त करणे असे प्रकार सर्रास आजूबाजूला घडत आहेत. दुर्दैवाने जनतेने बहुमताने निवडून दिलेले सरकारच हे प्रकार करीत आहे व जनतेचा आपल्याला पूर्ण पाठिंबा आहे असे सांगत आहे. वास्तविक आपल्या जंगलांची, पर्यावरणाची वाट लावण्यासाठी नक्कीच यांना निवडून दिलेले नाही. सरकारने पुढच्या पिढ्यांचे कल्याण ध्यानी घेऊन कारभार करावा ही पहिली पूर्वअट आहे. पण इथली सरकारेच पैसा व सत्ता यांच्या हव्यासापायी सर्व गोष्टींचा निकाल लावत निघाली आहेत. देशाचा प्रजासत्ताकदिन साजरा करीत असताना दिसणारे हे चित्र फार चांगले नाही. अशा स्थितीत १९४७ पूर्वी जनतेने एक होऊन एक जोरदार लढाई केली तशीच पुन्हा करण्याची वेळ आलेली आहे. त्या लढाईसाठी जनतेला हार्दिक शुभेच्छा.

विचार

# इराणमधील जनता रस्त्यावर का?

***इराणमध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात निदर्शने होत असल्यामुळे सरकारवर दबाव वाढला आहे. या गोंधळादरम्यान इराणच्या सेंट्रल बँकेच्या प्रमुखांनी राजीनामा दिल्यामुळे संकट आणखी गडद झाले. इराणमध्ये निदर्शने पुन्हा भडकण्याचे कारण काय, निदर्शकांच्या मागण्या काय आहेत आणि इराण या नवीन संकटाला तोंड देण्याचा प्रयत्न कसा करत आहे आणि या अस्वस्थतेच्या आगीत अमेरिका कसे तेल ओतत आहे, याचा हा वेध.***



**प्रा.जयसिंग यादव**

श्रीलंका, नेपाळ, बांगलादेशनंतर अलिकडे इराणमध्येही लोक रस्त्यावर उतरले. नेपाळ किंवा फ्रान्सप्रमाणे जेन झी रस्त्यावर उतरून आपल्याच सरकारला आव्हान द्यायला लागली आहे. राजधानीच्या मुख्य ग्रँड बाजाराभोवतीही निदर्शने झाली. निदर्शकांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. व्यापारी आणि दुकानदारांनी तेहरानच्या मध्यभागी सादी स्ट्रीटवर आणि राजधानीच्या मुख्य ग्रँड बाजाराजवळील शुश परिसरात मोर्चा काढला. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इराणच्या चलनाच्या आतापर्यंतच्या नीचांकी घसरणीनंतर आणि देशाच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख मोहम्मद रेझा फरझान यांनी राजीनामा दिल्याच्या वृत्तानंतर ही निदर्शने झाली. निदर्शकांना शांत करण्याचा प्रयत्न करताना, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी हा लोकांच्या जीवनमानाचा हा रोजचा प्रश्न आहे आणि निदर्शकांच्या मागण्यांना वैध म्हटले आहे. त्यांनी इराणच्या गृहमंत्र्यांना निदर्शकांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या न्याय्य मागण्या ऐकण्याचे निर्देश दिले आहेत; जेणेकरून सरकार समस्या सोडवण्यासाठी आणि जबाबदारीने प्रतिसाद देण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू शकेल. पाश्चात्य निर्बंधांमुळे इराणी अर्थव्यवस्थेला बसलेल्या धक्क्यामुळे निदर्शने सुरू झाली. खुल्या बाजारातील दरांवर लक्ष ठेवणाऱ्या वेबसाइटनुसार, देशाचे चलन, रियाल अमेरिकन डॉलरच्या तुलनेत सुमारे १३ लाख नव्वद हजाराच्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले. त्यामुळे व्यापक संताप निर्माण झाला. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार, सुमारे नव्वद दशलक्ष लोकसंख्येच्या इराणमध्ये रियालच्या घसरत्या मुल्यामुळे अन्नधान्याच्या किमती गगनाला भिडल्या.

इराणच्या भयानक आर्थिक परिस्थितीत लोक रस्त्यावर उतरले असताना, निदर्शक आणि सुरक्षा दलांमधील संघर्षांचे फुटेज ऑनलाइन समोर आले. इराण तीव्र महागाई आणि राष्ट्रीय चलनाच्या घसरणीशी झुंजत असताना ही निदर्शने समोर आली आहेत. अमेरिका आणि पाश्चात्य देशांनी लादलेल्या निर्बंधांचा बराच काळ परिणाम होत आहे; परंतु आता परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. 'स्टेट स्टॅटिस्टिकल सेंटर'च्या मते डिसेंबरमध्ये महागाई ४२.२ टक्क्यांवर पोहोचली. ती नोव्हेंबरपेक्षा १.८ टक्क्यांनी जास्त आहे. अन्नधान्याच्या किमती ७२ टक्क्यांनी वाढल्या आणि आरोग्य आणि वैद्यकीय पुरवठ्याच्या किमती गेल्या वर्षीच्या डिसेंबरच्या तुलनेत पन्नास टक्क्यांनी वाढल्या. गेल्या आठवड्याच्या शेवटी इराणचे चलन अमेरिकन डॉलरच्या तुलनेत विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले, तेव्हा त्याच्या आर्थिक अडचणी आणखी वाढल्या. 'इर्ना' या इराणच्या मुख्य सरकारी वृत्तसंस्थेनुसार रियालच्या तीव्र अवमूल्यनामुळे व्यवसायाला धोका निर्माण झाल्यामुळे मोबाईल फोन विक्रेते संतप्त झाले होते. इराणी सरकारने आर्थिक संकटावर उपाय करण्याचे आश्वासन दिले आहे. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, की लोकांचे जीवनमान ही माझी दैनंदिन चिंता आहे. सरकारने चलनविषयक आणि बँकिंग प्रणालींमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि लोकांची क्रयशक्ती राखण्यासाठी पावले उचलली आहेत.

महागाई सुमारे पन्नास टक्के असताना वीस टक्के पगारवाढ प्रस्तावित करणाऱ्या त्यांच्या सरकारच्या वादग्रस्त अर्थसंकल्पीय विधेयकाचे समर्थन करताना इराणच्या राष्ट्रपतींनी महागाई आणि महागाई वाढीशी लढण्याचे वचन दिले. तथापि, ही महागाई आणि घसरत्या चलनावर नियंत्रण मिळवण्याची शक्यता कमीच दिसते. इराणच्या आर्थिक संकटाविरुद्ध आणि चलन घसरणीविरोधात चौथ्या दिवशीही निदर्शने सुरूच राहिली. दक्षिण फार्स प्रांतातील फासा शहरातील स्थानिक सरकारी इमारतीवर निदर्शकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली. इराणी सरकारी माध्यमांच्या मते निदर्शकांच्या एका गटाने फासा गव्हर्नरेट कार्यालयाचे गेट तोडण्याचा प्रयत्न केला. चार दिवसांच्या निदर्शनांमध्ये जमाव पहिल्यांदाच हिंसक झाला आहे. या वेळी सुरक्षा दलांनी हस्तक्षेप करून हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला, गटाचे नेतृत्व करणाऱ्या २८ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली. सध्याची परिस्थिती निषेधापासून बंडाकडे वाटचाल करत असल्याचे दिसून येते. सरकार कधी चर्चेची ऑफर देत आहे तर कधी इशारे देत आहे; परंतु समस्येवर कोणताही उपाय निघत नाही. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इराणी रियाल विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचल्यामुळे महागाई आणि राहणीमान बिघडल्यानंतर ही निदर्शने इतर अनेक शहरांमध्ये पसरली. इस्फहान, याझद आणि झांजनसारख्या शहरांमधील विद्यापीठे आणि संस्थांमध्येही निदर्शने झाल्याचे वृत्त आहे. शांततापूर्ण निदर्शने कायदेशीर आहेत; परंतु हिंसाचार किंवा अराजकता सहन केली जाणार नाही, असे सरकार सांगत आहे.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या सत्तेला खरोखर धोका आहे का किंवा ही तात्पुरती अशांतता आहे का असे प्रश्न यावेळी उपस्थित केले जात आहेत. इराणमध्ये अस्तित्वात असलेली व्यवस्था आणि सरकारच्या कार्यपध्दतीवरून असे सूचित होत नाही, की खामेनी यांचा लवकरच पाडाव होणार आहे. इराणमधील सत्ता केवळ सरकारच्या हातात नाही, तर त्यावर 'रिव्होल्यूशनरी गार्ड' (आयआरजीसी), सुरक्षा संस्था आणि धार्मिक संस्थांचेही नियंत्रण आहे. इतिहास दाखवतो, की इराणी राजवटीने यापूर्वी मोठी निदर्शने बळजबरीने दडपली आहेत.

इराणच्या अणुकार्यक्रमावरून अमेरिका-इराण संबंध अनेकदा ताणले गेले आहेत. अमेरिका इराणला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे आरोप वारंवार केले जातात. सत्य हे आहे, की अमेरिकेच्या निर्बंधांमुळे इराणच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. तेल निर्यातीवरील बंदी आणि बँकिंग व्यवस्थेच्या ऱ्हासामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. सध्याच्या निदर्शनांमागे अमेरिकेचा थेट हात असल्याचा कोणताही ठोस पुरावा नसला, तरी इराणमधील निदर्शनांशी अनेकदा अमेरिकेचा संबंध जोडला जातो. कारण डोनाल्ड ट्रम्प सध्या त्या देशाचे अध्यक्ष आहेत. ट्रम्प आणि जॉन बोल्टनसारख्या अमेरिकन नेत्यांनी इराणमध्ये सत्ताबदलाची सातत्याने वकिली केली. अर्थात ट्रम्प यांनी कधीही स्पष्टपणे सत्ता बदलण्याचा हेतू जाहीर केला नाही. त्यांच्या मागील कार्यकाळात (२०१८) ट्रम्प यांनी ट्विटरवर लिहिले होते, की इराणी नेत्यांना इतिहासात कधीही न पाहिलेले परिणाम भोगावे लागतील. हे विधान राजवट बदलण्याची आणि सत्ता उलथवून टाकण्याची धमकी म्हणून पाहिले जात होते.

२०२० मध्ये कासिम सुलेमानीच्या हत्येनंतर ट्रम्प यांनी असेही लिहिले, की इराणी राजवटीला युद्ध हवे असेल, तर इराणचा अंत होईल. तथापि, ट्रम्प यांनी नंतर स्पष्ट केले, की ते राजवट बदलाबद्दल बोलत नव्हते. त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे, की अमेरिकेला राजवट बदल नको आहे; परंतु सध्याच्या निदर्शनांना मिळत असलेल्या पाठिंब्यावरून अमेरिका एका अर्थाने इराणमध्ये उठाव भडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. विद्यापीठातील विद्यार्थीदेखील निदर्शनांमध्ये सामील झाले आहेत. त्यांनी 'हुकूमशहा मरण पावला'सारख्या सरकारविरोधी घोषणा दिल्या. या घोषणा खामेनी यांच्याशीदेखील जोडल्या जात आहेत, कारण ते देशाचे सर्वोच्च नेते आहेत. काही निदर्शक १९७९ च्या इस्लामिक क्रांतीमध्ये पदच्युत झालेल्या दिवंगत शाह मोहम्मद रेझा पहलवी यांच्या मुलाच्या समर्थनार्थ घोषणा देतानाही ऐकले गेले. त्यात 'शाह चिरंजीव होवो'सारख्या घोषणांचाही समावेश आहे. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेत निर्वासित जीवन जगणारे रेझा पहलवी यांनी इंस्टाग्रामवर लिहिले, की मी तुमच्यासोबत आहे. आपण जिंकू, कारण आपले ध्येय बरोबर आहे आणि आम्ही एक आहोत. ते पुढे म्हणाले, की ही राजवट सत्तेत राहील, तोपर्यंत देशाची आर्थिक परिस्थिती बिघडतच राहील. यावरून इराणमधील संघर्ष कोणत्या थराला गेला आहे आणि तिथल्या सत्ताधीशांविरोधात नाराजी किती वाढली आहे, हे लक्षात येते.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# खऱ्या अर्थाने लोकशाही रुजविण्यासाठी प्रजासत्ताक दिन साजरा करू या !

**अरविंद मोरे**

काय रे भाऊ काय प्रोग्रॅम आहे ह्या वेळेस २६ जानेवारीचा? काही नाही रे २४, २५ आणि २६ हे तीन दिवस मस्त सुट्टी आहे. कुठे तरी जाऊ फिरायला. एन्जॉय करायला. हल्ली ही प्रतिक्रिया तरुणांपासून तर वरिष्ठां पर्यंत ऐकायला मिळत आहे. अरे पण २६ जानेवारी हा तर आपल्या भारत देशाचा प्रजासत्ताक दिन आहे. आपल्याला नाही जाता येणार बाहेर फिरायला. त्यात काय आपण झेंडा वंदन करून जाऊ. नाही तर जिथे कुठे जाऊ, किंवा जिथे कुठे राहू, तिथे झेंडा वंदन करू. शेवटी काय असते, २६ जानेवारी हेच न. झेंडा वंदन करणे, मिठाई वाटणे आणि थोरांचे तेच-तेच कंटाळवाणे भाषण ऐकणे हेच असते. शेवटी काय? काही तर अजूनही महाभाग असतात. जाऊ दे यार, तेच ते रोज सकाळी थंडीत उठणे आणि जाणे. जाऊ दे, मस्त सुट्टी आली आहे २६ जानेवारीची, मस्त थंडी पडत आहे. मी तर मस्त झोप काढणार आहे. मी एकटा नाही गेलो तर काय फरक पडणार आहे? सर्वसाधारण ह्या अशा प्रतिक्रिया आपणास दर २६ जानेवारीच्या अगोदर कानावर पडत असतात. तस काही माझा त्या २६ जानेवारीशी (प्रजासत्ताक दिवशी) काही एक संबंध नाही. ते शाळेवाले, महाविद्यालयातले आणि ऑफिसवाले बघत बसतील. त्यांचे काय ते झेंडावंदन करायचे ते करतील. माझा काय संबंध? मी शाळेत होतो तेव्हा ठीक आहे, तेव्हा दुसरा पर्याय नव्हता जावेच लागत होते. आता लहान मुलं-मुली बिचाऱ्या सकाळी थंडीत कुडकुडत उठतात आणि जातात. आपल्या शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करायला. मोठी मंडळी मात्र मस्त झोप काढत असतात. अशी सर्व साधारण परिस्थिती आपल्याला बघायला मिळते. २६ जानेवारी प्रजासत्ताक म्हणजे काय? हे सर्वप्रथम समजून घेणे फार गरजेचे आहे. प्रजासत्ताक म्हणजे अशी शासन व्यवस्था, जिथे देशाचा प्रमुख थेट किंवा जनतेद्वारे निवडला जातो. या व्यवस्थेत सर्वोच्च सत्ता लोकांच्या हातात असते आणि देश हा जनतेचा सार्वजनिक मामला मानला जातो. कोणा एका व्यक्तीची किंवा घराण्याची मालमत्ता नाही.

**प्रजासत्ताकाची प्रमुख वैशिष्ट्ये -**

लोकांचे सार्वभौमत्व : प्रजा हीच राजा असते, कारण निवडून दिलेले प्रतिनिधी प्रजेच्या वतीने राज्य कारभार चालवतात. समता व हक्क - सर्व नागरिकांना समान हक्क असतात आणि शासकीय पदे सर्वांसाठी खुली असतात.

संविधानाचे राज्य - प्रजासत्ताक राष्ट्र हे कायद्याने आणि संविधानानुसार चालते, एका व्यक्तीच्या इच्छेनुसार नाही. अगदी सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास प्रजासत्ताक म्हणजे '' लोकांसाठी, लोकांद्वारे आणि लोकांचे राज्य होय. भारतात २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू होऊन भारत एक प्रजासत्ताक देश बनला म्हणून या दिवशी प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय दिन आहे. भारताचे संविधान २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधान अंमलात आले. लाहोरजवळ रवी नदीच्या काठी अशोक चक्रांतिक तिरंगा ध्वज फडकावून पूर्ण प्रजासत्ताकाची घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हणले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची शाळा, महाविद्यालयांमध्ये भाषणाचे कार्यक्रम आयोजित केले जाते. हे एवढ्या पुरतेच सीमित नाही. वास्तविक ह्या दिवशी आपण प्रजासत्ताक दिन म्हणजे काय हे समजावून घेणे गरजेचे आहे. आपल्याला भारतीय संविधानाने दिलेले अधिकार आणि कर्तव्य सुद्धा समजून घेण्याची गरज आहे. जर आपल्याला आपले अधिकार आणि कर्तव्यच जर माहित नसले तर आपण आपले आणि आपल्या देशाचे रक्षणक कसे करणार? जे देशासाठी लढले, हुतात्मे झाले, त्यांचा संघर्ष समजून घेण्याची गरज आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान तयार करताना किती कष्ट घेतले हे समजून घेण्याची गरज आहे. आपल्याला शिक्षणाचा अधिकार, आपले मूलभूत अधिकार समजून घेण्याची गरज आहे. आपल्या देशाची प्रगती स्वातंत्र्य प्राप्ती नंतर आणि २६ जानेवारी १९५० नंतर प्रजासत्ताक झाल्यापासून आपण काय मिळविले? आणि काय मिळवायचे आहे? ह्याचा लेखाजोखा समजून घेणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. केवळ राज्यकर्त्यांवर टीका करून चालणार नाही तर आपल्याला त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. तो बजावून कायम स्वरूपी टिकविण्याची गरज आहे. केवळ त्यांचा उदोउदो व पूजा करून चालणार नाही. देशाची संपत्ती ही युवक आहे. युवक हे कोणत्याही देशाचे ऊर्जा केंद्र मानले जाते. ही तरुणाई लोकसंख्येचा लाभांश म्हणून पहिली जाते. केंद्र शासनाच्या आकडेवारीनुसार २०२१ मध्ये १५ ते १९ वयोगटातील युवकांचा ऐकून लोकसंख्येत सुमारे २७ टक्के वाटा होता. इतकी मोठी युवक संख्या असणे ही भारतासाठी रोजगार, श्रम बाजारपेठ आणि आत्मनिर्भरता या तिन्ही दृष्टीने मोठी संधी मानली जाते. पण ह्या आशावादी चित्रामागे एका अस्वस्थ करणारे वास्तव दडलेले आहे. भारतातील युवकांचा एका मोठा समूह ''नीट'' (नॉट इन एजुकेशन, एम्प्लॉयमेंट अँड ट्रैनिंग) या प्रवर्गात मोडतो आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (२०२०) नुसार सुमारे ३३% युवक नीट श्रेणीत येतात. म्हणजेच प्रत्येक तीन पैकी एका युवक ना शिक्षण घेत आहे, ना प्रशिक्षणात आहे, ना रोजगारात आहे. एकीकडे आपण स्वतःला युवकांचा देश म्हणवतो, तर दुसरीकडे या देशातील कोट्यवधी युवक अक्षरशः निष्क्रिय अवस्थेत आहेत. कोणत्याही रोजगारक्षम युवा वर्गाने असे निष्क्रिय राहणे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. फक्त बोटावर शाई, मतदान करणे एव्हढ्या पर्यंतच प्रजासत्ताक मर्यादित नाही ठेऊ या. आपला प्रजासत्ताक हा भष्टाचारमुक्त, भयमुक्त, दडपशाही मुक्त व युवकांना रोजगार देणारा असावा, असा या मंगल दिनी संकल्प करू या व खऱ्या अर्थाने लोकशाही रुजवू या. प्रजासत्ताक दिनाच्या सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा.

लोकसंसद

## राष्ट्रध्वजातील रंगांचा सन्मान राखला जावा !

जसजसे राष्ट्रीय सण जवळ येतात तसे भारतीयांचे देशप्रेम कमालीचे उफाळू लागते. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एक आठवडा आधीपासूनच काही उत्पादकांनी आपल्या उत्पादनांच्या पॅकेट्सवर तिरंगे छापायला सुरुवात केली आहे/ सामाजिक माध्यमांवर आपल्या देशप्रेमाची पावती देण्यासाठी झेंडे घेऊन सेल्फी काढण्यासोबत तिरंग्याच्या रंगाचे कपडे परीधान केलेले फोटो काढून ते अपलोड करणे, चेहऱ्यावर तिरंग्यासारखे टॅटू काढणे यांसारखे प्रकार सोशल मीडियावर मागील दोन दिवसांपासूनच पाहायला मिळू लागले आहेत.



स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याच्या तीन रंगाची इतकी क्रेझ असते कि, मिठाईच्या दुकानात तिरंगी पेढे आणि केकच्या दुकानांमध्ये तिरंगी केक्सना विशेष मागणी असते. बहुतांश दुकानाबाहेर राष्ट्रध्वजातील रंगांची फुग्यांची सजावट केली जाते. राष्ट्रध्वजाच्या रंगाचा अशाप्रकारे होत असलेला सुमार वापर पाहिल्यावर राष्ट्रध्वज ही शोभेची वस्तू तर बनली नाही ना ? असा प्रश्न पडतो. राष्ट्रध्वज हा राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे, त्याचा योग्य तो मान राखणे, हे प्रत्येक भारतीयाचे अलिखित कर्तव्य आहे. त्याग, क्रांती, शांती व समृद्धी या मूल्यांची शिकवण राष्ट्रध्वज आपल्याला देतो. उत्साहापोटी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा गैरवापर करतांना आपण ही मूल्येच पायदळी तुडवत नाही ना याचे भान राखले गेले पाहिजे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

दिनविशेष

# भारत बलशाली होईल

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही राष्ट्रीय सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्याला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या गुलामीतून भारत स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाचे कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम व कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते.

हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे आव्हान करण्यात आले. तेव्हा देशाचे संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. या संमतीने संविधानाचा मसुदा तयार करून तो ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सभेपुढे सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने दोन वर्ष, अकरा महिने आणि अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यावर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी




म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले.

संविधानाने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल !

**- श्याम ठाणेदार, ठाणे**

# सुधागडात पुन्हा बिबट्याची दहशत

## • वनविभागाकडून मात्र 'अफवा'असल्याचे स्पष्टीकरण

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात बिबट्याने मानवी वस्तीत अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. आता बिबट्याने आपल्या पंजाची दहशत सुधागड वासियांच्या मनावर ही पसरवायला सुरुवात केली आहे. सुधागड तालुक्यातील पाच्छापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला बिबट्याचा थरार आता अधिकच गंभीर वळणावर पोहोचला आहे. शुक्रवारी (दि.२३) संध्याकाळी म्हशी शोधण्यासाठी गेलेल्या एका शेतकऱ्याचा बिबट्याशी आमनासामना झाल्याची घटना घडली. यामुळे परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण आहे. वनविभागाकडून मात्र हल्ला केल्याची 'अफवा' असल्याचे स्पष्टीकरण दिले गेले आहे. परिणामी वनविभागाच्या भूमिकेबद्दल ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रश्नी आता सोमवारी (दि. २६) ग्रामस्थ वनविभागाच्या कार्यालयावर धडक देणार आहेत. शनिवारी (दि.२४) वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांसोबत संवाद साधला मात्र गावकऱ्यांनी वन विभागाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला. तसेच गावकरी कोणतीही अफवा पसरवत नसल्याचे सांगून प्रत्यक्षदर्शी यांनी आपला अनुभव सांगितला.



पाच्छापूर येथील रहिवासी गणपत बरगे हे शुक्रवारी (दि.२३) संध्याकाळी आपली म्हैस शोधण्यासाठी रानात गेले होते. यावेळी अचानक एक मादी बिबट्या आपल्या पिल्लासह त्यांच्या समोर आली. ही मादी बिबट्या दबक्या पावलाने त्यांच्याकडे येत असल्याचे पाहून बरगे यांनी प्रसंगावधान राखले आणि तातडीने जवळच्या झाडावर चढून आपला जीव वाचवला. त्यांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीला धावून आले, तेव्हा बिबट्या तिथून निघून गेला. सोबत पिल्लू असल्यामुळे मादी बिबट्या झाडावर चढली नाही, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता, असे बरगे यांनी सांगितले. या घटनेच्या धसक्यामुळे बरगे कुटुंबीयांनी आपली पोल्ट्री सोडून गौळमाळ येथे आपल्या शेजारील गावी जाऊन आश्रय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी येथील असानेवाडी येथील एका शेतकऱ्याच्या गाईला बिबट्याने मारले आहे.

> “ बिबट्याने हल्ला केल्याची बातमी चुकीची आहे. बिबट्याचा वावर परिसरात असला तरी त्याने अद्याप कोणत्याही नागरिकावर किंवा प्राण्यावर हल्ला केलेला नाही. काही व्यक्ती खोटी माहिती पसरवून दहशत निर्माण करत आहेत, अशांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अफवांना बळी पडू नये. वनविभाग परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून असून आवश्यक ती खबरदारी घेत आहे.
>
> -विशाल सोनवणे,
> वनपरिक्षेत्र अधिकारी,
> सुधागड-पाली. ”

### ग्रामस्थांचा संताप

या घटनेनंतर ग्रामपंचायत सदस्य उमेश तांबट यांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. मात्र, जोपर्यंत बिबट्या काही उपद्रव करत नाही, तोपर्यंत आम्ही काही करू शकत नाही, असे उत्तर वनविभागाकडून मिळाल्याचा दावा तांबट यांनी केला आहे. एखाद्याचा जीव गेल्यावरच वनविभाग जागा होणार का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. हा प्रश्न जीवन-मरणाचा असल्याने सोमवारी (दि.२६) सर्व नागरिक एकत्रितपणे वनविभागाच्या कार्यालयात जाऊन जाब विचारणार आहेत.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ जानेवारी

१) श्री. सत्यवान शंकर चांगे
नवगाव, २६-१-१९५६

२) श्री. अशोक प्रभाकर साष्टे
अलिबाग, २६-१-१९५४

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**श्री.कोतवाल**

---

## 'गणेशोत्सवामुळे गावात एकोप्याचे दर्शन'

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सवाची लोक चळवळ लोकमान्य टिळकांनी उभी केली. त्यामुळे लोक गणेशोत्सवाच्या निमित्ताने एकत्रित गुण्यागोविंदाने नांदत आहेत. याच उदात्त हेतूने पिरकोन व भोम येथे सार्वजनिक माघी गणेशोत्सवाची परंपरा जोपासली आहे. त्यातच सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्याची परंपरा गेल्या २६ वर्षांपासून पिरकोनने जपली आहे. त्यामुळे तरुणाईच्या कलागुणांना वाव मिळत असून



गावात एकीचे वातावरण निर्माण होत आहे असे प्रतिपादन महेंद्र घरत यांनी काढले. यावेळी साईंची मानाची पालखी काढणाऱ्या भोम गावातील युवकांनी महेंद्र घरत यांना आगरी समाज भूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सत्कार केला. यावेळी सर्पमित्र राजेश पाटील, गायिका प्रांजल पाटील, शैक्षणिक क्षेत्रात यश मिळविणारा साई पाटील, समाधान पाटील, क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरीय कामगिरी करणारा स्मित नारंगीकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विनोद म्हात्रे, ॲड अविनाश ठाकूर, घनश्याम पाटील, विजय केणी, अलंकार परदेशी, आनंद ठाकूर, किरण कुंभार, उमेश भोईर, भारती ठाकूर, राजेंद्र पाटील, किशोर केणी, सुशील पाटील, रवींद्र भगत, रोशन मोकल, गणेश म्हात्रे यांच्यासह कॉंग्रेस पक्षाचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## संत शिरोमणी जयंती उत्साहात

**कोलाड** : वरसे येथे रोहा पंचक्रोशी जंगम समाज यांच्या वतीने विनोदस्वामी जंगम यांच्या शिवम निवासस्थानी वीरशैव शिवयोगी श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचा ४६४ वा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मनोहर जंगम, विनोद जंगम, विरेंद्र जंगम, अरुण जंगम, किरण जंगम, प्रकाश जंगम, दिंगबर जंगम, अनंत जंगम, काशिनाथ, कृष्णा, अनंत गणेश, प्रल्हाद, राजेंद्र, प्रमोद, सागरजंगम, मयूर श्रीकांत आदी उपस्थित होते.

## वार्षिक पारितोषिक वितरणाचे आयोजन

**नवीन पनवेल** : पनवेल येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये (दि.२८) जानेवारी रोजी सकाळी ११ वा. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर समारंभास डॉ. रुपेश राऊत, सहसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई विभाग, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन माजी आ. बाळाराम पाटील, अरुण भगत, महेंद्र घरत, वाय. टी. देशमुख, विभागीय अधिकारी, कोंगेरे एम.के. आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून गुणी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केले आहे. सदर कार्यक्रमास डॉ. रमेश म्हात्रे, राजाराम पाटील, डॉ. लक्ष्मण गवळी मार्गदर्शन करणार आहेत.

## आश्रमशाळेचे वनभोजन उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील वनवासी कल्याण आश्रम संचलित आश्रमशाळा, माणगाव येथील विद्यार्थ्यांचे वार्षिक वनभोजन बुधवारी (दि.२१) रोजी उत्साहात पार पडले. भादाव गावाच्या हद्दीत काळ नदीच्या काठावर असलेल्या रम्य वनराईत हे वनभोजन आयोजित करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे पाच गट तयार करण्यात आले होते. प्रत्येक गटाने स्वतः विविध प्रकारचे पदार्थ तयार करून खाण्याचा मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी भाज्या,मासे तसेच चिकनचे विविध रुचकर पदार्थ बनवण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. यामुळे स्वयंपाक कौशल्य, संघभावना व स्वावलंबनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली. वनभोजनादरम्यान विद्यार्थ्यांनी गाणी, गोष्टी, खेळ उपक्रम सादर करून कार्यक्रमात अधिक रंगत आणली. या वनभोजनात आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी तसेच प्रकल्प अधिकारी कार्यालयातील फसाळे, निवाते, संस्थेचे रावसाहेब सोनवणे, नितीन चांदोरकर, प्रतिभा पोळेकर, वसंत पोळेकर, विजय शिंदे, उत्तम पाटील, अरुण पाटील आदी मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

## माध्यमिक विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**। उरण । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज नवीन शेवा येथे शिकणाऱ्या १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संस्थेचे संस्थापक माजी आ. मनोहर भोईर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, दहावी व बारावी ही आपल्या जीवनाची पहिली व दुसरी पायरी आहे, येथे आपण यशस्वी झालात तर जीवनात पुढे जीवनात यशस्वी होत जाल म्हणुन थोडे दिवस टीव्ही, मोबाइल पासून दूर राहा व खुप अभ्यास करून गुणवंत



होऊन आपले, गुरुजनांचे, आईवडिलांचे व आपल्या शाळेचे नाव मोठे करा. यावेळी बी एन डाकी, गणेश म्हात्रे, सोनल निलेश घरत, केंद्रप्रमुख म्हात्रे, गावंड, अमृत ठाकूर, मुख्याध्यापक संतोष म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात गणेश पूजन, सरस्वती पूजन व स्वागत गीतांनी करण्यात आली, तसेच विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे शैक्षणिक भेट देण्यात आली. सदर कार्यक्रमास नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे कमलाकर पाटील, शैलेश भोईर, मनोहर सुतार, शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुग्ण संख्येत वाढ

**अलिबाग** : सततच्या वातावरणामध्ये बदल होत असल्यामुळे सर्दी, खोकला, तापाचे रुग्ण वाढले आहेत. वातावरणातील हे बदल आणखी काही दिवस राहणार असून आरोग्याची काळजी घ्या असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. सकाळी धुके पडत आहे. पहाटे कडाक्याच्या थंडीमुळे सततच्या वातावरण बदलामुळे सर्दी, खोकला, ताप यासह साथीच्या आजारात वाढ झाली आहे.

## माथेरानचा घाटरस्ता ठरतोय डोकेदुखी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान येथे प्रवेश करण्यासाठी नेरळ मार्गे एकमेव घाट उपलब्ध आहे १९७२ साली माथेरान करांनी श्रमदान करून या रस्त्याचा पाया रचला होता परंतु आता हा रस्ताच येथील पर्यटनासाठी अडचण ठरत असून सलग लागून आलेल्या सुट्ट्यांमध्ये येथे प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने पर्यटकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे.पर्यायी मार्गाची माथेरान कर मागणी करत असताना त्यास दबावाखाली



केराची टोपली दाखवली जात आहे. दरवेळी सुट्ट्यांच्या हंगामात माथेरान दस्तुरी नाक्यावर आणि घाटरस्त्यात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शनिवारी आणि रविवारी माथेरानला पर्यटकांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती. नेरळ माथेरान हा एकमेव घाटरस्ता असल्याने आणि दस्तुरी वाहन पार्किंग मध्ये अपुरी पार्किंग व्यवस्था यामुळे पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मुंबई पुण्यापासून जवळचे ठिकाण असल्याने माथेरानला सर्वाधिक पसंती दिली जाते त्यामुळे इथे पर्यटनाच्या माध्यमातून सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. प्रवासी कर आणि वाहन कराच्या माध्यमातून नगरपालिका आणि वनखात्याला चांगल्या प्रकारे उत्पन्न प्राप्त होते. परंतु येणाऱ्या पर्यटकांना आवश्यक सेवासुविधा निर्माण करुन देण्यासाठी शासन स्तरावर आजमितीपर्यंत ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. पर्यटनस्थळ विकसित व्हावे अशी कोणत्याही प्रकारची राजकीय पक्षांच्या नेत्यांची मुळात इच्छाशक्ती नसल्याने हे सुंदर पर्यटनस्थळ आजही मागासलेल्या अवस्थेत दिसत आहे. जग एकविसाव्या शतकात वाटचाल करत असताना इथे अद्यापही पर्यायी व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. जो पर्यटक आपल्या लहान मुलांना, वयोवृद्ध आई वडिलांना इथे फिरावयास घेऊन येतो त्यांना साधी वाहतुकीची सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. स्थानिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे असेही सूर उमटताना दिसत आहेत.

---

**परपोषी वेलीच्या आक्रमणाने बळीराजा धास्तावला** | **संकटावर मात कशी करावी हा प्रश्न**

# कडधान्य पिकावर अमरवेलीचे आक्रमण

**। महाड । प्रतिनिधी ।**

शेती व शेतकऱ्यांवर सतत येणाऱ्या विविध संकटांची मालिका थांबण्याचे नावच घेत नसल्याचे दिसत आहे. त्यातच कडधान्य पिकावरील हमखास उत्पन्नाचे पीक असलेल्या वाल, पावटा, उडीद, तूर पिकावर नारू अमरवेल या पिवळ्या रंगाच्या परपोषी वेलीने आक्रमण करायला सुरुवात केली असुन शेतीवरील आलेल्या या पिवळ्या संकटाने बळीराजा धास्तावलेला आहे.

शेतकरी वर्गाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असताना, कडधान्यांमध्ये वाल, पावटा, उडीद, तूर इत्यादी शेतकरीवर्गाने



लागवड केलेल्या कडधान्यांच्या पिकावर आता दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी देखील नारू या परप-ोषी वेलीने आक्रमण केल्याने बहरलेल्या कडधान्याच्या पिकाला धोका निर्माण झाला आहे. नारु परपोषी वेल कडधान्य पिकांवरील वाल, पावटा, उडीद, तूर, तागाच्या शेतीकडे जास्त आकर्षित होते. ही नारुची वेल कितीही काढली तरी पुन्हा रात्रीच्या सुमारास तिची मोठ्या प्रमाणात वाढ होते, त्याची वेल काढणारे शेतकरी त्यांच्या पोटात मळमळणे, डोळे चुरचुरणे किंवा डोके जड होणे अशा प्रकारचे विकार जडत असल्याचे येथील शेतकरी वर्गाने सांगितले.

कडधान्याची पिके घेताना कोणत्याही प्रकारची खते, कीटकनाशके, नवीन बी-बियाणे मजूरदार व अन्य मशागतीचे कामे करावी लागत नसल्याने घरच्या घरी ही शेती मोठ्या प्रमाणात करता येते. कडधान्य पिकातून शंभर टक्के उत्पादन मिळत असल्याने शेतकरी वर्गाला कडधान्याची शेती परवडत असल्याने एक हमखास उत्पन्नाचे साधन बनले आहे.

कडधान्य पीक तयार होण्याचा कालावधी केवळ तीन ते चार महिन्याचा असल्याने या कालावधीत दररोज विविध कडधान्याची ताजी भाजी मिळते, तर कडधान्याच्या पिकांच्या काढणीच्या कालावधीत मिळणारे उत्पन्न बाजारात विक्री करून बऱ्यापैकी पैसा मिळत असल्याने शेतकरीवर्ग कडधान्याचे पीक शेतीमध्ये समाधानी दिसत असतो. परंतु कडधान्यावर आलेल्या संकटावर मात कशी करावी हा मोठा प्रश्न शेतकरीवर्गापुढे उपस्थित झाला आहे.

कडधान्य बहरण्याच्या काळातच हे पिवळे संकटकडधान्य पिकाला बहार येवू लागली आहे आणि पिकावर नारूची वेल यायला सुरुवात झाली आहे, तिची वाढ अशीच होत राहिली, तर कडधान्याच्या पिकाचा तुटवडा जाणवेल आणि त्यामुळे पोपटी सुध्दा ला-वणे मुश्कील जाईल. यासंदर्भात वारंवार येथील शेतकऱ्यांनी सदर पिवळ्या संकटापासून मुक्तता मिळावी यासाठी कृशीखात्याकडे मागणी केली आहे, मात्र थोड्याबहूत प्रमाणात काही ठिकाणी यश आले आहे, तर कित्येक ठिकाणी अजूनही मोठया प्रमाणात पिवळ्या संकटाने शेतकरी पुरता हैराण झाला आहे. कडधान्य बहरण्याच्या काळातच हे पिवळे संकट उभे राहिल्याने पाळा मरुण पीक बहरणार नाही अशी भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

---

# निवडक



## खारगल्लीत नेत्र तपासणी शिबीर

**रेवदंडा** : मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा या सेवा भावनेतून अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्तालगत खारगल्ली-साईनगर धोबन तळयाचे समोरील प्रशांती निवासमध्ये विनामुल्य नेत्र शिबीर शुक्रवारी (दि.२३) जानेवारी रोजी संपन्न झाले. या नेत्र शिबीरास सुरेश मेहरे डॉ. हिताशी परब, श्रावणी मसुरकर, वैभव वाघ, शिवराम पटेल, नरेश पटेल, देवानंद हाले, अर्चना पारखी, जागृती हाले, शिवदास तांडेल, शरद वरसोलकर आदीने परिश्रम घेतले. खारगल्ली साईनगर प्रशांती निवास येथे श्रीसाई नेत्रालयाचे वतीने ओपीडी युनिटव्दारे प्रत्येक महिन्याचा २३ तारखेला नेत्र तपासणी संबधीत सर्व उपचार करण्यात येतात.



## एकता महिला बचत गटाचे हळदी-कुंकू

**पनवेल** : खारघर शहरात प्रसिध्द असलेल्या एकता महिला बचत गटाच्या माध्यमातून हळदी-कुंकू कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात खारघर व परिसरातील विविध वयोगटातील अनेक महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक हळदी-कुंकूच्या निमित्ताने महिलांचा स्नेह, एकोप्याची भावना आणि आत्मीय संवाद अनुभवायला मिळाला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी एकता महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनाली वारुंगसे यांनी उपस्थित महिलांना सांगितले. तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिलांना नियमित बचत, लघुउद्योग, स्वयंरोजगार, घरगुती उद्योग, तसेच आपत्तीच्या काळात एकमेकांना आर्थिक आधार मिळतो हे सांगितले. अनेक महिलांनी बचत गटामुळे घरखर्चात हातभार लावला, मुलांच्या शिक्षणासाठी निधी उभारला आणि स्वतःच्या पायावर उभं राहून कुटुंबात निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळवला, हिच महिला सक्षमीकरणाची खरी सुरुवात असल्याचे त्यांनी या वेळी शब्दांत व्यक्त केले.यावेळी त्यांनी महिलांना आवाहन केले. भीती, संकोच आणि मर्यादा झुगारून स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. एकता महिला बचत गट हा केवळ आर्थिक व्यवहारांचा समूह नसून, तो महिलांच्या स्वप्नांना दिशा देणारा, अडचणीत साथ देणारा आणि यशात आनंद वाटून घेणारा कुटुंब आहे, असे त्यांनी सांगितले.




## वाहतूक सुरक्षेतेसाठी चित्रकला स्पर्धा

**पनवेल** : कळंबोली वाहतूक सुरक्षा पोलीस दलातर्फे १ ते ३० जानेवारी हा महिना, रस्ता सुरक्षा मास म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने कळंबोली वाहतूक पोलिसांनी आणि कार्मेल कॉन्व्हेन्ट हायस्कूल कळंबोली यांच्या विद्यमाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाच्या प्रांगणात रस्ता सुरक्षा आणि नियम यावर आधारित चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन जणू वाहतूक पोलिसांना या उद्देशासाठी आम्ही ही तुमच्या सोबत आहोत हा संदेशच दिला. यावेळी कळंबोलीमधून प्रभातफेरी काढून सर्व जनतेला वाहतुकीचे नियम आणि सुरक्षा किती महत्वाची आहे, याचे महत्व पटवून दिले. या विद्यार्थ्यांसोबत वाहतूक पोलीस दलातील पोलीस, शाळेतील शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या घोष वाक्यानी कळंबोली परिसर दणाणून गेला. वाहतूक सुरक्षेसाठी कार्मेल कॉन्व्हेन्ट हायस्कूलच्या या विद्यार्थ्यांचा पुढाकार आणि उत्साह पाहून परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. याप्रसंगी कळंबोली वाहतूक सुरक्षा दलाचे हणमंत गलांडे, रवींद्र कोकणे, राजेंद्र भांडारकर उपस्थित होते.




## लायन्स क्लबतर्फे हेल्मेट वाटप

**उरण** : रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी यांच्या वतीने राजिप शाळा, फुंडे येथे हेल्मेट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले. लहान वयापासूनच रस्ते सुरक्षेचे महत्त्व समजावे व सुरक्षित प्रवासाच्या सवयी लागाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमास भूमिका सिंग, मोनिका चौकर, सीमा घरत, गोपाळ विटकर, सोनिया पाटील यांची उपस्थिती लाभली. हा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक रमणिक म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व शालेय कर्मचारीवर्गाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी विशेष अतिथी म्हणून उमेश घरत तसेच निर्मला मच्छिंद्र घरत गट शिक्षण अधिकारी उपस्थित होते.

## कशेणेत सिकलसेल जनजागृती

**माणगाव** : कशेणे गावात विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज यांच्या वतीने आयोजित हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी सामाजिक उपक्रमाच्यानिमित्ताने सिकलसेल ॲनिमिया जनजागृती कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूरचे सुधीर खैरे यांची उपस्थिती लाभली. यावेळी खैरे



यांनी उपस्थित नागरिकांना सिकलसेल ॲनिमिया आजाराचे मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य शिक्षण देत नागरिकांना या आजाराविषयी जागरूक केले. सदर कार्यक्रमात ० ते ४० वयोगटातील लाभार्थींना आरोग्य सेवा व रक्त तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. याप्रसंगी नारायण पांचाळ, महेश पांचाळ, रोशन सुतार, नागेश पांचाळ, महेश सुतार, तुकाराम सुतार आदी उपस्थित होते.

# निवडक

## उरण शहरातील जलवाहिनी फुटली

**उरण :** उरण शहर, परिसरातील गावे व प्रकल्पांना पाणीपुरवठा करणारी एमआयडीसीच्या रानसई धरणातील मुख्य जलवाहिनी गुरुवारी (दि.२२) सायंकाळच्या सुमारास फुटली. त्यामुळे या सर्व भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. ही मुख्य वाहिनी जीर्ण झाल्याने ती फुटली असून दोन तासांत जवळपास हजारो लिटर पाणी वाहून गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू असून ही जलवाहिनी १५ फुट खाली असल्याने अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. उरण शहर, परिसरातील गावे व ओएनजीसीसह इतर प्रकल्पांना पाणीपुरवठा हा एमआयडीसीच्या रानसई धरणातून करण्यात येते. गुरुवारी (दि.२२) सायंकाळच्या सुमारास ९०० मिली मीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी फुटल्याची घटना घडली. त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया गेले असून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून या जलवाहिनीच्या गळती दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, ही जलवाहिनी दिघोडे-चिर्ले रस्त्याच्या जवळ १५ फुट खाली असल्याने जलवाहिनीच्या दुरुस्तीच्या कामात कामगारांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला आहे. या जलवाहिनीचे दुरुस्तीचे काम शनिवारी (दि.२४) पुर्ण झाले असून पाणीपुरवठा सुरळीत चालू करण्यात येणार असल्याचे एमआयडीसी प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



## जलशुद्धीकरण यंत्र भेट

**आगरदांडा :** रुग्णसेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ब्रीद जपत मुरुड शहरातील सर सिद्दि अहमद खान हायस्कूलच्या जुन्या एसएससी बॅचच्या विद्यार्थ्यांनी मुरुडमधील संजिवनी आरोग्य सेवा संस्थेच्या कै. अंजनीबाई पुंडलिकराव लहाने हेल्थ ॲण्ड केअर सेंटरला आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात एकत्र येऊन जमविलेल्या वर्गणीतून आरओप्लँटची भेट देत अनोखी रुग्णसेवा साधली आहे. सन १९७५ च्या जुन्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या बॅचमधील पन्नासहून अधिक विद्यार्थी आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात एकत्र येऊन त्यांनी नुकतेच एक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे केले होते. या दरम्यान जमविलेल्या वर्गणीतून सामाजिक बांधिलकी जपत आपल्या शाळेसह येथील संजिवनी आरोग्य सेवा संस्थेलाही जलशुद्धीकरण यंत्र भेट देण्याचे ठरवले होते. याप्रसंगी नितीन पवार, माजी मुख्याध्यापक उदय गद्रे, उल्हास चौलकर, उदय चौलकर, पांडुरंग आगरकर, गणेश सुकाळे, दिप्ती दांडेकर, लता घरत, किशोर नाईक, दिलिप पोकळ, सुनील रणदिवे, विनय दांडेकर, संजय नाईक, रविंद्र कारेकर, रुग्णालयाचे प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे, विजय सुर्वे, राशिद फहिम, प्रमोद भायदे, मंगेश दांडेकर, आदेश दांडेकर, अजित गुरव, शकिल कडू, वासंती उमरोटकर, जहुर कादिरी, कीर्ती शहा आदी उपस्थित होते.



## ई-रिक्षात वाढ करण्याची मागणी

**कर्जत :** सुप्रिम कोर्टाचे सरन्यायाधीश यांनी माथेरानच्या हातरिक्षा अमानवीय स्वरूपाचे असल्याने नमुद करून माथेरान मधील हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा द्वारे पुनर्वसन करण्याचे आदेश सहा महिन्यांत निर्णय घेऊन द्यावेत, असे दि.६ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आपल्या आदेशात म्हटले आहे आहे याच पार्श्वभूमीवर सह नियंत्रण समितीने नेमलेल्या उपसमितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी माथेरान येथे जन सुनावणी आयोजित केली होती. यावेळी माथेरानच्या विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी ई-रिक्षांची संख्या १०० च्या आसपास असावी, अशी मागणी केली आहे. सध्या २० ई-रीक्षांचे पायलेट प्रोजेक्ट सुरू आहेत. माथेरानमध्ये ब्रिटिश काळापासून वाहन बंदी आहे. त्यामुळे याठिकाणी घोडा व हात रिक्षा यांनाच परवानगी आहे. परंतु, हात रिक्षा ही अमानवीय स्वरूपाची प्रथा बंद करून त्यांना अंतर्गत वाहतुकीसाठी ई-रिक्षा द्याव्यात, यावर राज्य शासनाने निर्णय घेण्याचे आदेश देखील न्यायालयाकडून देण्यात आले आहेत. परंतु, निष्क्रिय स्थानिक प्रशासनाकडून सहा महीने पुर्ण होत आले तरी अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्याने स्थानिक प्रशासना विरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- जन्नावार हॉस्पिटल अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- आवश्यक : सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदार आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान: नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २४ ते ३१ जानेवारी २०२६ सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.
- दिशा पॅथॉलॉजी लॅब –रेवदंडा व चोंढी येथील कलेक्शन सेंटरसाठी ब्लड कलेक्शन टेक्निशियन /नर्स/फ्लेबोटॉमिस्ट (अनुभवी)/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- अलिबागमधील शॉपमध्ये काम करण्यासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ९४२२६९६२३५
- घरकामासाठी सकाळच्या वेळेत बाई पाहिजे. अर्धवेळसाठी ८ ते ११–३० स्थळ : पंतनगर, संपर्क : ८०९७२०५९३९, ९४२२३७५१२४
- पाहिजेत : अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क : श्री. मधुकर पाटील ९२७३८९०९१५/९४७०३२५१०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# सलग सुट्ट्यांमुळे वाहतूक कोंडी

## महामार्गासह इतरही ठिकाणी पर्यटक बेजार; पोलिसांनी योग्य नियोजन करणे अपेक्षित

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

सलग तीन दिवस सुट्ट्या आल्याने रायगड, तळकोकणात व गोव्याला जाण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात बाहेर पडले आहेत. परिणामी शनिवारी-रविवारी मुंबई-गोवा महामार्गावर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. त्याचबरोबर पाली शहरात देखील वाहतूक कोंडी झाली होती. पर्यटक व प्रवासी या कोंडीने बेजार झाले होते.



चौथा शनिवार, रविवार आणि २६ जानेवारी ची सुट्टी अशा सलग तीन सुट्ट्या आल्यामुळे मुंबई, ठाणे, पुणे आदी शहरातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर तळ कोकण, गोवा आणि रायगड या ठिकाणी पर्यटनासाठी निघाले. एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर वाहने निघाल्यामुळे मुंबई गोवा महामार्ग आणि इतरही मार्गांवर प्रचंड वाहतुकीचा ताण आल्याने वाहतूक कोंडी झाली होती.

शनिवारी सकाळपासूनच मुंबई गोवा महामार्गावर लोणेरे ते माणगाव दरम्यान, नाणोरे ते ढालघर फाटा येथे, तसेच कशेणे गाव ते इंदापूर, पोटणेर, कोलाड, खांब गाव, कोलेटी याठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

अवघे तीन ते चार किलोमीटरचे अंतर कापायला खूप वेळ लागत होता. तसेच पाली खोपोली मार्गावर पाली फाटा ते इमॅजिक इथे देखील वाहतूक कोंडी होती. यामुळे प्रवासी व पर्यटक पुरते बेजार झाले होते.

विशेष म्हणजे मुंबईकडून गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरतीच वाहतूक कोंडी होती. तर गोव्याच्या दिशेकडून मुंबईकडे जाणारा मार्ग मोकळा होता.

पाली शहरात देखील मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. कारण येथून विळे-कोलाड व माणगाव मार्गे कोकणात व गोव्याला जायला रोड आहे अनेक पर्यटक या मार्गे प्रवास करत होते. परिणामी पाली शहरात व पुढील मार्गावर वाहतूक कोंडी होती. या संदर्भात स्थानिक प्रशासनाने व पोलिसांनी योग्य नियोजन करून वाहतूक कोंडी सोडवणे अपेक्षित होते. मात्र तशा प्रकारे वाहतुकीवर नियंत्रण करण्यासाठी कोणी नव्हते. असे पालीतील मयूर कारखानीस यांनी सांगितले.

### महामार्गाची रखडपट्टी

मुंबई-गोवा महामार्गाचा पहिला टप्पा पळस्पे ते इंदापूर ८४ किमी लांबीचा आहे. मागील १७ वर्षापासून अजून पूर्ण झालेला नाही. अनेक ठिकाणच्या उड्डाणपूलांचे काम अजून बाकी आहे. त्यामुळे त्याच्या बाजूने खराब रस्त्यातून जावे लागते. इंदापूर व माणगाव बायपास रस्त्याचे काम रखडले आहे. तसेच आणखी बऱ्याच ठिकाणी रस्त्याची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत आणखीन भर पडते.

### गतिरोधकांचा त्रास

इंदापूर ते पळस्पे दरम्यान अनेक ठिकाणी गतिरोधक आहेत. मात्र या गतिरोधकांना कोणतेही मोजमाप नाही. कुठे उंच गतिरोधक आहेत तर कुठे रुंद गतिरोधक आहेत. तर काही गतिरोधकांना पांढरे पट्टे देखील मारण्यात आलेले नाहीत. यामुळे वाहने जोरदार आदळतात तर काही वेळेला अपघात होतात तसेच वाहतूक सुद्धा मंदावते व कोंडी होते.

> सलग सुट्ट्या आल्यामुळे ट्रॅफिक वाढली आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस तैनात करण्यात आले आहेत. शिवाय शनिवारी व रविवारी अधिक पोलीस तैनात असतात. पुणे व मुंबई या बाजूने एकाचवेळी अनेक वाहने दाखल झाली. तसेच या ठिकाणी पर्यायी रस्त्याची व्यवस्था नसल्याने वाहतूक कोंडी आणखी वाढते. वाहनचालकांनीही वाहतुकीची नियम पाळावेत जेणेकरून वाहतूक सुरळीत होईल.
>
> –निवृत्ती बोऱ्हाडे, पोलीस निरीक्षक, माणगाव पोलीस ठाणे

## जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांसाठी सामाजिक बांधिलकीचे कार्य करणारे नवी मुंबई येथील टूवर्षीप मुंबई व श्री साई ट्रस्ट यांच्या माध्यमातून तालुक्यातील गुडवणवाडीमधील आदिवासी विद्यार्थ्यांना जीवनवाहस्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. टूवर्षीप मुंबई व श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्या सहकार्याने गुढवणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जेठवाणी, अनिता नेगी, संजय राधिका घुले, दिलीप घुले, पाटील, फोडसे, सपकाळ, ग्रामस्थ तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि पालक उपस्थित होते.



भारताच्या प्रजासत्ताकदिनानिमित्त समुद्रकिनाऱ्यावर मुले ध्वज घेऊन आनंद साजरा करताना. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## वाजेकर महाविद्यालयात भित्तीपत्रकाचे उद्घाटन

**| उरण | प्रतिनिधी |**

राष्ट्रीय मतदार दिन २५ जानेवारी २०२६ च्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेज, फुंडे येथे मतदार जागृती भित्तीपत्रकाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी आवीष कुमार सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर भित्तिपत्रके इलेक्ट्रोल लिटरसी क्लब व राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केले. याप्रसंगी मुलांचे तहसीलदार कदम यांनी मतदानाची शपथ वाचून नव मतदार विद्यार्थ्यांनाही शपथ घ्यायला लावली.



तसेच उप जिल्हाधिकारी सोनवणे यांनी उपस्थित नव मतदार विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क सर्वांनी बजावा यासाठी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आवाहन केले, तसेच वीर वाजेकर महाविद्यालय नेहमीच शासकीय उपक्रमांना आणि मतदार जागृती कार्याला प्राधान्याने सहकार्य करते त्याबद्दल महाविद्यालयाचेही आभार मानले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी सोनवणे, तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. उद्धव कदम, नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांच्यासह कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, प्रा. राम गोसावी, डॉ. राजकुमार कांबळे, डॉ संदीप घोडके, उपप्राचार्य गजानन चव्हाण, डॉ. चिंतामण दिंधळे, प्रा. श्रीकांत गोतपागर, डॉ. सुजाता पाटील, प्रा. भूषण ठाकूर, प्रा प्रांजल भोईर यांनी सहभाग घेतला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## मतदार जनजागृती अभियान



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

राष्ट्रीय मतदार दिन उठा जागे व्हा, मतदार करा लोकशाही मजबूत करुया मतदानाचा अमुल्य अधिकार बजावणे तुमचा हक्क आहे असे आव्हान वसंतराव नाईक महाविद्यालयाचे डॉ. सुभाष म्हात्रे यांनी मतदार जनजागृती अभियानात केले. यावेळी महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थ्यांनी पोस्टर व्दारे मतदान जनजागृती करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ जनार्दन कांबळे, डॉ.सुभाष म्हात्रे, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ. नारायण बागुल, डॉ. गजानन मुनेश्वर, डॉ. सीमा नाहिद, प्राध्यापक रुफी हसवारे, अच्युत पोतदार आदिंसह प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नारायण बागुल तर आभार प्रदर्शन डॉ. श्रीशैल बहिरगुडे यांनी केले.

## मंगळसूत्र खेचून चोरटा पसार

**पनवेल :** पनवेल जवळील भंगारपाडा येथे राहणाऱ्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून एक इसम पसार झाल्याची घटना घडली आहे. मंजुळा दमडे (५५) या पारगाव येथून चालत घरी जाताना, पाठीमागून आलेल्या एका लुटारूने त्यांना जोरात धक्का दिला. धक्यामुळे मंजुळा खाली पडल्यानंतर, त्याने यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले. मंगळसूत्र खेचताना मानेला दुखापत झाली. याप्रकरणी त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून अधिक तपास सरू आहे.



पनवेलच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रीय ध्वज तिरंगा घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. (छायाचित्र. राजेश डांगळे)

## संजय जोशी यांची नियुक्ती

**पनवेल :** खारघर पोलीस ठाण्याच्या वपोनि पदी संजय जोशी यांची नियुक्ती झाली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी



पनवेल शहर पोलीस ठाणे व उरण पोलीस ठाणे येथे दमदार कामगिरी करणारे संजय जोशी यांची खारघर पोलीस ठाण्याच्या वपोनि पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि अजय कांबळे यांची नेरुळ पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे.

## वारंवार जलवाहिनी फुटल्याने पाणी वाया | पाणीपट्टी न भरण्याचे ग्राहकांना आवाहन

# श्रीवर्धन नगरपरिषदेचे चोवीस कोटी पाण्यात

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन नगरपरिषदेकडून शहरात पाणीपुरवठ्यासाठी रानवली धरणावर चौवीस कोटी रुपये खर्चीत आधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प उभारला असून सदरचा प्रकल्प सौर ऊर्जेवर चालवला जात आहे. २०२३ मध्ये कार्यान्वित झालेल्या या प्रकल्पाद्वारे शहराला शुद्ध पिण्याचे पाणी देण्याचा प्रयत्न आहे. रानवली धरण ते श्रीवर्धन या आठ किलोमीटर अंतरावर उच्च घनतेच्या पॉलिथिलीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.



श्रीवर्धन येथे साधारण २७०० नळ ग्राहक असून जलशुद्धीकरण प्रकल्प लोकार्पण सोहळा संपन्न झाल्यावर ग्राहकांना शुद्ध पाणी येणे अपेक्षित होते. अनेकदा अशुद्ध पाण्याचा पुरवठा तसेच काही दिवसातच पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला काही अंतरावर चार ते पाच फुटी तडे जात असल्याने वारंवार पाणी पुरवठा बंद करण्यात येत असून नळ ग्राहकांची गैरसोय होते. जलवाहिनी वारंवार फुटल्याने पाणी वाया जात असून नगरपरिषदेचे जलशुद्धीकरण प्रकल्पात चोवीस कोटी रुपये पाण्यात गेल्याची टिका ग्राहकांकडून होत आहे.

पाणीपुरवठा योजना निविदा व डिझाइन प्रमाणे केली आहे. जेव्हा पाणीपुरवठा योजना आमच्याकडे चालवायला होती, तेव्हा योजना सुरळीतपणे चालू होती. सद्यस्थितीत गळती का होत आहे, याबाबतीत संबंधित कर्मचारी कशी चालवतात व त्यासाठी त्यांना तांत्रिक प्रशिक्षणाची गरज आहे का हे पाहावे लागेल असा खुलासा रविराज इंडस्ट्रीज कंपनीने केला आहे.

### गंज-प्रतिरोधक जलवाहिनी

उच्च घनतेच्या पॉलिथिलीन जलवाहिन्या या पाणी वितरणासाठी अत्यंत टिकाऊ, लवचिक आणि गंज-प्रतिरोधक जलवाहिनी आहे. ज्यांचा वापर प्रामुख्याने जल वितरण प्रणालीसाठी केला जातो. या जलवाहिन्यात रासायनिक प्रतिरोधकता आणि हवामानातील बदलांना तोंड देण्याची क्षमता असते, ज्यामुळे ते दीर्घकाळ टिकतात.असा दावा केला जातो.परंतु, वारंवार जलवाहिनी फुटत असल्याने श्रीवर्धन नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या जलवाहिन्या उच्च दर्जाच्या आहेत का, अशी शंका ग्राहक करीत आहेत.

> नगरपरिषदेकडून योग्य पाणी पुरवठा होत नसेल तर ग्राहकांनी पाणीपट्टी भरू नये. ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्या वर कारवाई झाली पाहिजे तसेच ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये का टाकू नये. जलवाहिनी फुटल्यावर हजारो लीटर पाणी वाया जाते याचा हिशोब ठेकेदार देणार की नगरपरिषद.
>
> – संतोष वेश्वीकर. नगरसेवक,श्रीवर्धन नगरपरिषद.

# मासेमारीला खराब हवामानाचा फटका

## मत्स्य उत्पादन घटल्याने मच्छिमार, मासेविक्रेते त्रस्त

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सततच्या खराब हवामानामुळे समुद्रात मत्स्य उत्पादन बरेच घटले आहे. यामुळे मागील दोन महिन्यांपासून रायगड जिल्ह्यातील मच्छिमार व्यवसाय अडचणीत सापडला असून, मच्छिमार बोट व्यावसायिकांवर आर्थिक संकट ओढावले आहे. समुद्रातून मासे कमी मिळत असल्याने या व्यावसायिकांना बोट चालवण्याचा खर्चही परवडेनासा झाला आहे. वरवर सोपी वाटणारी मासेमारी मुळात खूपच कठीण असे काम आहे. समुद्राच्या भरती-ओहोटीचा अंदाज बांधून मासेमारी करावी लागते. सध्या तर सतत वातावरणात बदल होत आहेत. याचा फटका समुद्रातील जैवविविधतेलाही बसला आहे. फक्त वातावरणच नाही, तर मोठ्या जहाजांमधील खराब तेल आणि शहरातील सांडपाणी समुद्रात सोडले जाते. त्याचा फटका मासेमारीला बसत आहे.



मच्छिमार बहुतेक वेळा समुद्राच्या काही अंतरावर मासेमारी करण्याचा प्रयत्न करतात, पण सध्याची परिस्थिती पाहता त्यांना खोल समुद्रात जावे लागत आहे. मात्र तेथेही समाधानकारक मासेमारी होत नसल्याचे मच्छिमार मंडळी सांगतात. मासेमारीसाठी जाणाऱ्या प्रत्येक बोटीचा खर्च खूप असतो. डिझेल, खलाशांची मजुरी, जाळी व इतर गोष्टींचा देखभालीचा खर्च याचा त्यात समावेश आहे. त्यामुळे अपेक्षित प्रमाणात मासे न मिळाल्यास हा खर्च वसूल होत नाही आणि त्याचा तोटा सहन करावा लागतो. सध्या हाच खर्च परवडत नसल्याने रायगडच्या समुद्रकिनारी असंख्य बोटी उभ्या करण्याचा निर्णय मच्छिमार व्यावसायिकांनी घेतला आहे. या परिस्थितीचा थेट फटका मच्छीविक्रीवर अवलंबून असलेल्या महिला विक्रेत्यांनाही बसत आहे.

मागील अनेक दिवसांपासून मासेविक्रेत्या महिलांचे उत्पन्न घटले आहे. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन खर्चाचा प्रश्नही गंभीर बनला असल्याची माहिती महिला मच्छिमार विक्रेत्या देतात. याबाबत मासेविक्रेत्या सांगतात, की दररोज मासे विकून घरखर्च चालवत असतो. मात्र गेल्या महिनाभरापासून मासेच मिळत नसल्याने आमच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक मच्छीमार व मासेविक्रेत्यांनी शासनाकडे आर्थिक मदत, सवलती आणि तातडीच्या उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली असून परिस्थिती लवकर सुधारावी, अशी मागणी जोर धरत आहे

गेल्या महिनाभरापासून अत्यंत कमी प्रमाणात मासे मिळत असल्याने आम्ही बोटी किनाऱ्यावरच उभ्या केल्या आहेत. खर्च परवडत नसल्याने हा निर्णय घेतला आहे. यामुळे आमच्यासमोर आर्थिक प्रश्न निर्माण झाला असून, शासनाने त्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी कोळीबांधवांनी केली आहे

### इतर व्यवसायांना फटका

या मच्छिमारी व्यवसायावर बर्फ कारखाने, साठवणूक केंद्रे, वाहतूकदार, जाळी दुरुस्ती करणारे कामगार अशा अनेक लहान-मोठ्या व्यवसायांचाही उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे मच्छिमारी संकटात सापडल्याने संपूर्ण किनारपट्टीवर उदरनिर्वाहाचे मोठे संकट निर्माण झाले आहे. शेकडो मच्छिमार बोटी, हजारो खलाशी आणि हजारो मासेविक्रेत्यांना या परिस्थितीचा फटका बसत आहे. यासोबतच साठवणूक करणारे कारखाने व व्यापारीवर्गालाही नुकसान सहन करावे लागत आहे.

## महेश नामदेव कळस यांचे निधन

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

प्राथमिक शिक्षक कैलास कळस आणि पत्रकार उदय कळस यांचे भाऊ महेश कळस यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दिनांक २४ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार बोर्लीपंचतन येथील स्मशानभूमीत करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, गणेश पेठ मंडळ (खोतकंपनी) नामदेव शिंपी समाज बांधव मित्र मंडळी उपस्थित होते. सोमवारी (दि.२) दशक्रिया विधी समारंभ सकाळी नऊ वाजता बोर्लीपंचतन स्मशान भुमीत करण्यात येणार आहे. तर बुधवारी (दि.४) उत्तरकार्य विधी श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील निवासस्थानी करण्यात येणार आहेत. महेश कळस यांच्या कुंटबियांत त्यांचे मागे दोन मुले, आई, पत्नी, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे.



## उर्स कमेटी राऊत मोहल्ला मोर्बा आयोजित कव्वालीचा जंगी सामना

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

उर्स कमेटी जमातुल मुस्लिमीन राऊत मोहल्ला मोर्बा यांच्यावतीने मोर्बा येथे उर्स शरीफचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने सोमवारी (दि.२६) दुपारी ३ वा.संदल व मंगळवारी (दि.२७) रात्री ९ : ३० वा. कव्वालीचा जंगी सामना आयोजित करण्यात आला आहे.

तरी या कव्वाली कार्यक्रमाचा कव्वाली शौकिनांनी आनंद लुटावा, असे आवाहन जमातुल मुस्लिमीन राऊत मोहल्ला मोर्बा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

उर्स कमेटी जमातुल मुस्लिमीन राऊत मोहल्ला मोर्बा यांच्यावतीने सय्यद जमालुद्दीन शाह कादरी यांच्या उर्स शरीफनिमित्त सोमवारी दुपारी १ वाजता स्नेह भोजन, दुपारी ३ वाजता संदल पूर्ण गावात फिरून सायंकाळी ५ वाजता दर्गाच्या मजारीवर चढवला जाईल. या उर्स निमित्त मंगळवारी रात्री कव्वालीचा शानदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कव्वाली कार्यक्रमात सुप्रसिद्ध कव्वाल दानिश मोनीश अली खान व साकिब अली साबरी यांच्यात कव्वालीचा जंगी सामना होणार आहे. तरी कव्वालीच्या तसेच उर्सच्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन उर्स कमेटी जमातुल मुस्लिमीन राऊत मोहल्ला मोर्बा यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## युवा चित्रकार वरद यांचे चित्रकला विषयावर प्रात्यक्षिक

**। उरण । प्रतिनिधी ।**

युसुफ मेहर अली सेंटर संचलित भानूबेन प्रवीण शहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तारा येथे विद्यार्थ्यांसाठी प्रवास चित्रकलेचा या विशेष उपक्रमांतर्गत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात उरणचे सुपुत्र, युवा चित्रकार वरद खुशाली विलास गावंड यांनी इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसमोर शाळेतील शिक्षिका रवीना म्हात्रे यांचे मव्यक्तिचित्रफ रेखाटण्याचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि रचनात्मक वैचारिक वृद्धी व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

चित्रकला ही केवळ कागदावरील रंगकाम नसून ती विचारांना दिशा देणारे एक प्रभावी माध्यम आहे. सृजनशीलतेमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होते. शाळेच्या वतीने चित्रकार वरद यांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चित्रकला विषयाबद्दल नवचैतन्य निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## रोह्यात काव्य संमेलनाचे आयोजन

**रोहा :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आज सोमवारी (दि.२६) रोजी रात्री ९:३० वा.रोहे शहरात ऑल इंडिया मुशायरा व काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती कवी शरीफ मंजर यांनी दिली. रोहा धावीर रोड येथील रोहेकर चौक येथे संपन्न होणाऱ्या ऑल इंडिया मुशायर कार्यक्रमाचे नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. यावेळी अंजुम लखनवी मलंग मालेगावी, हुन्नर रसूलपुरी, शब्बीर अहमद माहीर, मुखतसर लखनवी, निहाल आजमी, मुस्तफा काझी, जहीर राशीद, समर जोनपुरी, सावेश जखमी, सादिया इकरा प्रतापगडी, शगुफ्ता अंजुम लखनवी, संद्या दिवकर, ज्योती शिंदे यांच्या समवेत अनेक प्रसिद्ध कवी उपस्थितीत राहणार आहेत. या कार्यक्रमाची जय्यत तयार सुरु असून रायगडकर शायरी व काव्य प्रेमी मंडळींनी या कार्यक्रमाचे लाभ घ्यावा, असे आवाहन शायर शरीफ मंजर यांनी केले आहे.

## महामार्गावरील खड्ड्यांमुळे कशेळे परिसरात दोन ठिकाणी भीषण अपघात

### खड्डे बुजवण्याची नागरिकांची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या शहापूर मुरबाड कर्जत या राष्ट्रीय महामार्ग वर कशेळे येथे भीषण अपघात घडल्याची घटना पहाटे चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे. एक अवजड वाहन या रस्त्यावरील खड्डा चुकवत असताना थेट रस्त्याखाली गेल्याने मोठा अपघात घडला. दरम्यान रस्त्यावरील खड्डे यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाने रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाने केली आहे.



शहापूर मुरबाड कर्जत राष्ट्रीय महामार्ग रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहनाला मुरबाड करून जेएनपीटी बंदराकडे जाणाऱ्या अवजड वाहनाला अपघात झाला. कर्जत तालुक्यातील कशेळे येथील भवानी माता मंदिरासमोर असलेल्या खड्ड्यांमध्ये आपटून गाडीमधील पाटे तुटल्यामुळे हा अपघात घडल्याचे ड्रायव्हर यांनी ही माहिती दिली. त्यांची गाडी मुरबाडवरून अकोला येथील स्टील कंपनीमधून स्पेअर पाईप घेऊन कोल्हापूरकडे जात असताना समोरून येणाऱ्या गाडीच्या लाईटचा प्रकाश आणि रस्त्यावर असलेले खड्डे यामुळे हा अपघात झाला. रस्त्यातील मोठमोठे खड्डे असल्याने खड्ड्यांमध्ये गाडी आदलून गाडीचे पाटी तुटल्यामुळे गाडी पलटी झाल्याची घटना घडली असल्याचे दिसून आले.कशेळे परिसरातील अनेक ठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडत आहेत आणि त्यामुळे वाहनांचे नुकसान तसेच जीवितहानी होत आहे. एमएमआरडीसीला या खड्ड्यांबाबत सातत्याने निवेदने दिली जात आहेत. तरीही एमएमआरडीसीने याकडे दुर्लक्ष केल्याने अशा अनेक घटना घडत आहे. ग्रामस्थांकडून या घटनेचा निषेध केला जात आहे आणि येणाऱ्या काळात उपोषण व आंदोलनाचा तीव्र इशारा देण्यात आला आहे.

कशेळे येतील भवानी मंदिरासमोर घडलेली घटना सकाळी चारच्या सुमारात घडली. सुगवे येथील नदीच्या पुलावरील पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास एल पी गाडी खर्डे वाचवण्यासाठी ब्रेक मारला असता त्याच रस्त्याने मागाहून येणाऱ्या एलपी गाडीचा ब्रेक न लागल्यामुळे समोरील गाडीला ठोकून गाडी नदीच्या कठड्यावरून खाली कोसळण्याची घटना घडली आहे. चंद्रपूरवरून खोपोलीकडे दगडी कोळसा वाहतूक करणारी गाडी नदीलगतच्या कठड्यावरून खाली कोसल्याची घटना घडली आहे. एलपी गाडी चालकाला स्टेरिंगचा धक्का लागला. छातीला जबर मार लागला असल्याने तात्काळ कर्जत येथील हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. दिनानाथ सखाराम कोळी रा. वृंदावन सोसायटी, ठाणे यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये तशी सविस्तर बोलणी झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- आंबेघर, ग्रामपंचायत आंबेघर, मौजे- आंबेघर येथील गट नं. २८ एकुण क्षेत्र ५-३४-०० हे.आर.चौ.मी. आकार रु. ७-९० पैसे पैकी श्री. दिनानाथ सखाराम कोळी यांचे मालकीचे व नावे असलेल्या १-३३-३० हे.आर.चौ.मी. या जमिनी पैकी ०-३०-०० हे.आर. चौ.मी. ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी जमिन विकत घेणार यांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १० (दहा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची ०-३०-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २६/०१/२०२६

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६. तळ मजला,
शिवाजी पथ, पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे-चेवणे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. श्रीकृष्ण विष्णु पालांडे ऊर्फ पाळंदे | ४९ | ० | ८-२५-०० | ५-०० |

सदरील मिळकतीपैकी खरेदी देणार यांचे मालकीचे हे.आर.चौ.मी ४-००-०० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-२६/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे-वरईतर्फे निड,ता.कर्जत जि.रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. सुपर्णा यतेंद्र दाभाडे | ४४ | ७ | ०-०७-६० | १-२५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-२६/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या शेतजमिनी आमचे अशिल क्र. १) मनाली महादेव शिंदे, क्र.२) श्री. महादेव नागु शिंदे दोघे राहणार मु.पो. वरंडे वनवली तालुका अलिबाग जिल्हा रायगड यांचे ताबेकब्जा वहिवाटीखाली आहेत. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मौजे | गट नंबर | क्षेत्र | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | भादाणे | ८२ | ०-४९-०० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| २ | वनवली | ४६ | ०-३६-१० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ३ | वनवली | ४७/१ | ०-९५-२० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ४ | वलवली | ४७/२ | ०-९५-२० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ५ | वरंडे | ४५४/१ | ०-०७-९० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ६ | वरंडे | ४५४/२ | ०-२१-३० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ७ | वरंडे | ४५५ | ०-३१-४० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ८ | वरंडे | ४५६/१ | ०-६३-७० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ९ | वरंडे | ४५६/२ | ०-०७-६० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| १० | वरंडे | ४५७ | ०-४७-५० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |
| ११ | वरंडे | ४५८ | ०-२९-३० | शारदा गणपत पाटील वगैरे ४ |

सदर, वर वर्णनांकीत केलेली जमिन मिळकती आमचे अशिलांचा ताबा कब्जा व वहिवाटीत असून मागील वीस वर्षे होऊन अधिक आमचे अशिल सदर मिळकतींची उपभोगत आहे व त्यातून उत्पन्न मिळवत आहे. सदर वर नमूद मिळकती या विद्यमान मालक, आमचे अशिलांचा ताबे कब्जा व वहिवाट हक्क असताना परस्पर विक्री करणार असल्याचे आमची अशिलाचे निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये त्यात आमचे सक्त कायदेशीर हरकत आहे, राहील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षीसपत्र, साठेकरार, वचनचिठ्ठी, समंजस करार केल्यास त्यास आमची सक्त हरकत असून, अशा कोणतेही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :- २६-०१-२०२६

सही/-
**ॲड. यु डब्ल्यू सय्यद**
अलिबाग रायगड
मो.नं.९९२२७१६५६०

# प्रवाशांसाठी एसटी संगे तीर्थाटन योजना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी नाळ जोडून, त्याच्या श्रद्धेला सुरक्षिततेची आणि परवडणाऱ्या खर्चाची जोड देणारी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे एसटी संगे तीर्थाटन योजना सुरू केली आहे.

ही योजना म्हणजे श्रद्धा, सुविधा आणि सामाजिक न्याय यांचा सुरेख संगम आहे.ही योजना स्वस्त आणि सुरक्षित या ब्रीद वाक्यावर आधारित असून, सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल अशा दरात धार्मिक पर्यटनाची अनुभूती देण्याचा तिचा मुख्य उद्देश आहे. राज्य शासनाने एसटी प्रवासासाठी विविध सामाजिक घटकांना दिलेल्या सर्व सवलती या योजनेत जशाच्या तशा लागू राहणार आहेत. महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना मूळ तिकिटावर ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना विनामूल्य प्रवास देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत प्रत्येक आगार कार्यक्षेत्रातून ४० प्रवाशांचा गट तयार करून, त्यांच्या सामाजिक सवलतीच्या तिकीट दरात सहली आयोजित केल्या जाणार आहेत. या सहलींसाठी एसटीच्या नव्या, सुरक्षित आणि आरामदायी बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असून, प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे.

२३ जानेवारी २०२६ पासून ही योजना राज्यातील २५१ आगारांत एकाच वेळी राबविण्यात येणार आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार प्रत्येक आगारातून किमान ५ बसेस या योजनेसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने, राज्यभरात एका दिवशी सुमारे १,००० ते १,२५० धार्मिक व पर्यटन विशेष बसगाड्या धावणार आहेत. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला एक नवे बळ मिळणार आहे

प्रवाशांच्या मागणीनुसार अष्टविनायक दर्शन, ११ मारुती दर्शन, पंढरपूर अक्कलकोट, तुळजापूर, कोल्हापूर, पन्हाळा, जोतिबा, गणपतीपुळे, शेगाव, शिर्डी अशा विविध श्रद्धास्थळांच्या सहली आयोजित केल्या जाणार आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक वैभवाचा अनुभव घेण्याची ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे.स्वस्त आणि सुरक्षित पर्यटन ही केवळ संकल्पना न राहता प्रत्यक्षात उतरवणारी ही योजना म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांच्या सर्वसामान्यांवरील प्रेमाची आणि विचारांचीच पुढची पायरी आहे. त्यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त सुरू होत असलेली एसटी संगे तीर्थाटन योजना भाविकांसाठी श्रद्धेचा, सुरक्षिततेचा आणि समाधानाचा प्रवास ठरणार आहे.

## उरणमध्ये हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न

**उरण :** खान्देश महिला मंडळ नवी मुंबई उरण तर्फे हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमास महिलांनी भरभरून मदत कार्य केले.या कार्यक्रमात महिला भगिनींनी उस्फूर्त सहभाग घेतला. भारतीय संस्कृतीत हळदी कुंकू कार्यक्रमाला विशेष महत्व असून या कार्यक्रमातून संस्कृतीचे सर्वत्र जतन, संवर्धन होत आहे. शिवाय या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला आपापसातील मतभेद विसरून एक झाल्या.

## विद्यार्थ्यांनी केले परसबागेतुन 'पक्षीनिरीक्षण'

**। उरण । प्रतिनिधी ।**

निसर्गाबद्दल प्रेम आणि कुतूहल जागृत करण्याच्या उद्देशाने उरण तालुक्यातील मोठीजुई येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अनोख्या पक्षीनिरीक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेच्या स्वतःच्या परसबागेत राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर पडून निसर्गाचे जवळून निरीक्षण करण्याची संधी मिळाली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिक्षकांच्या पुढाकाराने हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला. शाळेची परसबाग विविध प्रकारच्या भाज्या, फळे आणि फुलांनी बहरलेली असल्यामुळे तिथे अनेक स्थानिक पक्ष्यांचा वावर असतो. याच नैसर्गिक वातावरणाचा फायदा घेत, विद्यार्थ्यांना सकाळी लवकर शाळेच्या बागेत जमण्यास सांगण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी दुर्बिणीतून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शांत राहून पक्ष्यांच्या हालचाली कशा टिपायच्या, याची माहिती दिली.या निरीक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे पक्षी पाहायला मिळाले. यामध्ये प्रामुख्याने चिमण्या, कावळे, पोपट, साळुंक्या, लाल बुडाचा बुलबुल, भारद्वाज, खाटिक, वटवट्या, व्हला, कबुतर, आणि काही फुलचुख्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी पक्ष्यांचे रंगरूप, आवाज आणि त्यांच्या खाण्याच्या सवयींचे बारकाईने निरीक्षण केले. काही विद्यार्थ्यांनी तर त्यांच्या निरीक्षणांची नोंद वहीत करून ठेवली. केवळ पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता,असे शिक्षक कौशिक ठाकूर यांनी सांगितले.

# बांगलादेशवरील कारवाईने पाक वठणीवर



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

७ फेब्रुवारी २०२६ रोजी २० सुरू होणार आहे. या विश्वचषकापूर्वी एक मोठा निर्णय घेतला आणि बांगलादेशला विश्वचषकाच्या बाहेर केले आहे. बांगलादेशला बहिष्कार टाकणं खूपच महागात पडले. यानंतर पाकिस्तानही विश्वचषकावर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत होता पण आयसीसीचे टोकाचे पाऊल पाहता त्यांनी त्यांची भूमिका बदलून आता विश्वचषकापूर्वी मोठा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २५ जानेवारी रोजी या स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. संघ जाहीर करुन बहिष्कार टाकण्याची भूमिका बदलण्याचा निर्णय पाकिस्तानने घेतला असल्याचे दिसत आहे. या महत्त्वाच्या स्पर्धेसाठी निवडकर्त्यांनी बाबर आझम, फहीम अश्रफ आणि मोहम्मद नवाज सारख्या अनुभवी खेळाडूंना संघात समाविष्ट केले आहे, तर मोहम्मद रिझवान आणि हरिस रौफ सारख्या खेळाडूंना वगळले आहे. पाकिस्तान या विश्वचषकात सलमान अली आघाच्या नेतृत्वाखाली खेळेल.

२५ जानेवारी रोजी सकाळी लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर पत्रकार परिषदेद्वारे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने संघाची घोषणा केली. पीसीबीचे उच्च कामगिरी संचालक आणि पुरुषांच्या राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य, आकिब जावेद, पाकिस्तानचे टी-२० कर्णधार सलमान अली आघा आणि व्हाईट-बॉल मुख्य प्रशिक्षक माइक हेसन पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

आगामी विश्वचषकासाठी पाकिस्तानच्या संघात या मोठ्या स्पर्धेत प्रथमच सहा खेळाडूंचा समावेश आहे. कर्णधार सलमान अली आघा, फहीम अश्रफ, ख्वाजा मोहम्मद नाफे, मोहम्मद सलमान मिर्झा, साहिबजादा फरहान आणि उस्मान तारिक पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकात खेळणार आहेत. २०२६ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी, पाकिस्तान ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर टी-२० मालिका खेळेल.

पाकिस्तान टी-२० विश्वचषकात आपल्या मोहिमेची सुरुवात ७ फेब्रुवारी रोजी नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्याने करेल. हा सामना कोलंबोमध्ये खेळला जाईल. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी त्यांचा सामना अमेरिकेशी होईल. भारत आणि पाकिस्तानयांच्यातील अंतिमसामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्येच होईल. गट टप्प्यातील पाकिस्तानचा शेवटचा सामना १८ फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध होईल. या टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानला ग्रुप ए मध्ये स्थान देण्यात आले आहे.

# महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचाराचा झंझावात



**। सोगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची उमेदवारी अर्ज मागे घेण्यापूर्वीच प्रचाराला ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आवास मतदार संघातील मुनवली येथे काँग्रेस व शेकाप महाविकास आघाडीचे रायगड जिल्हा परिषदेचे लोकप्रिय उमेदवार राजाभाऊ ठाकूर व अलिबाग पंचायत समितीच्या किहीम गणातील लोकप्रिय उमेदवार अनिता शिंदे यांच्या प्रचाराला रविवारी (दि. २५) सकाळी मुनवली हनुमान मंदिरात श्रीफळ वाढवून मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रचाराला आलेले रायगड जिल्हा परिषदेचे उमेदवार राजाभाऊ ठाकूर व किहीम पंचायत समितीच्या गणातील उमेदवार अनिता शिंदे हे यांना सुनिल थळे व सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी दोन्ही उमेदवारांना मोठ्या प्रमाणात मताधिक्य मिळवून देणार आहोत, असा ठाम विश्वास दिला. दरम्यान मुनवली ग्रामस्थांनी यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद व पाठिंबा देत भरघोस मतदान करून विजयी करण्याचा शब्द दिला आहे. याप्रसंगी रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष सुनिल थळे, ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश वडे, सातिर्जे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच प्राची ठाकूर, आवास जिल्हा परिषद मतदारसंघाचे शेकाप चिटणीस संदिप गायकवाड, किहीम उपसरपंच मिलिंद पडवळ, राजन भोईर, किरण ठाकूर, आकाश राणे, किहीम ग्रामपंचायत सदस्य संतोष किर, मापगाव ग्राम पंचायत माजी सदस्य चंद्रकांत खोत, संजय शिंदे, माजी सदस्या सानिका घाडी, विवेक जोशी, दिलीप मोंढे, सामाजिक कार्यकर्ते सतिश घाडी, सचिन घाडी, प्रविण घाडी, अक्षय जाधव, मनिष खाडे, जयेश ठकरूळ, प्रणित पुजारी, रुपेश अनमाने, सम्राट ठाकूर, निकेश अनमाने तसेच काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाचे अनेक कार्यकर्ते आणि मुनवली ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






● कावीर जिल्हा परिषद मतदार संघातील शेकापचे उमेदवार मोहन धुमाळ तसेच काविर पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार अनिल पाटील यांचा प्रचार जल्लोषात करण्यात आला. घोटवडे येथील श्री हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली.





● गोंधळपाडा येथे महाविकास आघाडीच्या चेंढरे जिल्हा परिषद गटातील उमेदवार प्रविणा घासे आणि पंचायत समिती गणातील उमेदवार प्रिया ढवळे यांच्या प्रचारासाठी महिलांची एकजुट दिसून आली. उमेदवारांसोबत असणाऱ्या महिलांनी उमेदवारांचा प्रचार आणि विकासात्मक मुद्दे मतदारांसमोर मांडून मतदानाचा हक्क बजावण्यास सांगितले.

# दिल्लीने रोखला बंगळुरूचा विजयरथ



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेच्या यंदाच्या हंगामात झंझावाती फॉर्मात असणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा विजयरथ अखेर दिल्ली कॅपिटल्स संघाने रोखला. पाचपैकी पाचही सामने जिंकणाऱ्या बंगळुरू संघाला दिल्लीने चीतपट केलं. बडोद्याच्या कोटंबी स्टेडियमवर झालेल्या मुकाबल्यात बंगळुरूला १०९ धावाच करता आल्या. दिल्लीने ७ विकेट्स आणि २६ चेंडू राखून दिमाखदार विजय मिळवला.


■ नंदिनी-मिनूच्या यशस्वी प्रयत्न

■ मॅरिझान-लॉराने चढवला कळस

ग्रेस हॅरिस आणि स्मृती मानधना यांनी बंगळुरूला ३६ धावांची सलामी दिली. मॅरिझान कापने हॅरिसला बाद करत ही जोडी फोडली. तिने ९ धावा केल्या. स्मृतीने जॉर्जिआ वॉलच्या साथीने धावफलक हलता ठेवला. मिनू मामीने स्मृतीला बाद करत बंगळुरूला धक्का दिला. स्मृतीने ३४ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह ३८ धावांची खेळी केली. श्री चरणीने गौतमी नाईकला तंबूत परतावलं. कापने वॉलला त्रिफळाचीत केलं. तिने ११ धावा केल्या. ऋचा घोष, नादिन डी क्लार्क यांच्याकडून बंगळुरूला मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र मनीने ऋचाला तर हेन्रीने क्लार्कला बाद केलं. राधा यादवने १८ धावांची खेळी करत प्रतिकार केला. बंगळुरूच्या तळाच्या फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. दिल्लीतर्फे नंदिनी शर्मान ३ तर चिन्ले हेन्री, मॅरिझान काप आणि मिनू मानी यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खराब झाली. सायली सतघरेने वादळी खेळीसाठी प्रसिद्ध शफाली वर्माला माघारी धाडलं. तिने १६ धावा केल्या. भरवशाच्या लिझेल ली हिलाही सायलीनेच तंबूत धाडलं. मात्र यानंतर अनुभवी लॉरा वॉल्व्हडार्ट आणि कर्णधार जेमिमा रॉड्रिग्ज यांनी तिसऱ्या विकेटसाठी ४९ चेंडूत ५२ धावांची भागीदारी केली. राधाने जेमिमाला बाद करत ही जोडी फोडली. जेमिमाने २४ धावा केल्या. जेमिमा बाद झाल्यानंतर लॉराने सूत्रं हाती घेत संयमी खेळी साकारत दिल्लीला महत्त्वपूर्ण विजय मिळवून दिला. तिने ३८ चेंडूत ४ चौकार आणि एका षटकारासह नाबाद ४२ धावांची खेळी केली. अनुभवी मॅरिझान कापने १५ चेंडूत १९ धावा करत तिला चांगली साथ दिली.

## जोकोचा ऐतिहासिक ४०० वा विजय



**मेलबर्न :** टेनिस विश्वात नवे विक्रम रचण्याचा धडाका कायम ठेवत दिग्गज नोव्हाक जोकोविचने शनिवारी ग्रँड स्लॅममधील ४०० वा आणि ऑस्ट्रेलियन ओपनमधील १०२ वा विजय नोंदवला. २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेत्या जोकोविचने ऑस्ट्रेलियन ओपनच्या तिसऱ्या फेरीत बोटिक वान डे झँड्सचल्पचा पराभव केला. यासह ग्रँड स्लॅम एकेरी सामन्यांमध्ये ४०० विजय मिळवणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. या विजयामुळे ऑस्ट्रेलियन ओपनमधील त्याचे जय-पराजयाचे रेकॉर्ड १०२-१० असे झाले आहे. या स्पर्धेत सर्वाधिक सामने जिंकण्याच्या बाबतीत त्याने रॉजर फेडररच्या कारकिर्दीतील विक्रमाशी बरोबरी केली आहे. जोकोविचने १० वेळा ऑस्ट्रेलियन ओपन विजेतेपद पटकावले आहे.

## मुंबई बाद फेरीत

**मुंबई :** डोमेस्टिक क्रिकेटमधला दादा संघ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईने हैदराबादचा धुव्वा उडवत दिमाखात बाद फेरीत प्रवेश केला. मुंबईची अशीच घोडदौड कायम राहिली तर ४३वे जेतेपद प्रत्यक्षात साकारू शकते. उत्पल इथल्या राजीव गांधी स्टेडियम वर झालेल्या लढतीत मुंबईने हैदराबादविरुद्ध ९ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला.

## प्रियुक्ता म्हात्रेला बेल्ट रेसलिंग राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नुकत्याच गोवा येथे झालेल्या बेल्ट रेसलिंग आणि मास रेसलिंग राष्ट्रीय स्पर्धेत अलिबाग मधील पेजारी गावाची गोल्डन कन्या कुमारी प्रियुक्ता मृदुल म्हात्रे पहिली मॅच गोवा बरोबर जिंकली नंतर दिल्ली बरोबर जिंकून लास्ट नागालँड राज्यातील मुलीला हरवून महाराष्ट्राला गोल्ड मेडल देणारी सर्वात छोटी खेळाडू ठरली.



प्रियुक्ता हिला लहानपणापासून खेळाची आवड असल्यामुळे तिची आई सायली म्हात्रे आणि बाबा मृदुल म्हात्रे यांनी जय शोतो कान कराटे अँड स्पोर्ट अकॅडमीम ध्ये संतोष कवळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पेझारी साई मंदिर येथे प्रवेश घेतला.

प्रियुक्ता हिला मार्गदर्शन खेलो इंडिया मेडलिस्ट जिज्ञासा पाटील, तन्मई पाटील, आणि आदित्य चव्हाण, वेदिका कवळे , रोहन गुरव, यांचे मार्गदर्शन लाभले.

### टीम इंडिया ग्रुप बी मध्ये अव्वल स्थानावर | भारतीय युवा संघ सुपर सिक्समध्ये

# भारत-पाकिस्तान १ फेब्रुवारीला भिडणार



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारत आणि पाकिस्तान सामना म्हटलं की चर्चा ही होतेच. भारत आणि पाकिस्तान सामन्याचे क्रेझ आपल्याला नेहमीच पाहायला मिळाले आहे. भारत आणि पाकिस्तान सामना लोक आवर्जून पाहतात. आता या उभय संघामध्ये १ फेब्रुवारीला सामना रंगणार आहे.

भारतीय क्रिकेट संघाने २०२६ च्या १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या सुपर सिक्समध्ये स्थान निश्चित केले. त्यांनी शेवटच्या गट सामन्यात न्यूझीलंडचा सात विकेट्सने पराभव केला. यामुळे टीम इंडिया ग्रुप बी मध्ये अव्वल स्थानावर आहे. आयुष म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील संघ आता सुपर सिक्समध्ये खेळेल, जिथे त्यांचे दोन सामने खेळायचे आहेत.

सुपर सिक्समध्ये भारतीय संघ झिम्बाब्वे आणि पाकिस्तानशी सामना करेल. टीम इंडियाचा सामना २७ जानेवारी रोजी झिम्बाब्वेशी होईल, त्यानंतर १ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानशी होईल. दोन्ही सामने बुलावायोमध्ये खेळले जातील. झिम्बाब्वे आणि पाकिस्तान दोघेही ग्रुप सी मधून पुढे गेले. पाकिस्तान ग्रुप सी मध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिला, तर झिम्बाब्वे तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

भारत आणि पाकिस्तान शेवटचे २०२० मध्ये १९ वर्षांखालील विश्वचषकात आमने सामने आले होते. दोन्ही संघ उपांत्य फेरीत खेळले होते, ज्यामध्ये भारताने १० विकेट्सने विजय मिळवला होता. २०१८ च्या आवृत्तीत, टीम इंडिया आणि पाकिस्तान उपांत्य फेरीतही आमनेसामने आले होते. भारताने २०३ धावांनी विजय मिळवला. यापूर्वी, २०१२ मध्ये, दोन्ही शेजारी संघ आमनेसामने आले होते आणि भारताने एका विकेटने विजय मिळवला होता. २०१० हा हंगाम होता जेव्हा पाकिस्तानने अंडर-१९ विश्वचषकात भारताचा शेवटचा पराभव केला होता. पाकिस्तानने दोन विकेटने विजय मिळवला होता.

भारतीय संघाने अंडर-१९ विश्वचषक सुपर सिक्समध्ये चार गुणांसह प्रवेश केला. त्यांनी त्यांचे सर्व गट सामने जिंकले, ज्याचा त्यांना सुपर सिक्समध्ये फायदा होईल. भारताने प्रथम अमेरिकेचा सामना केला आणि त्यांना सहा विकेटने पराभूत केले.

# मुंबईत रंगणार कुस्त्यांची दंगल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशातील कुस्तीप्रेमींसाठी अभिमानाचा आणि इतिहास घडवणारा क्षण मुंबईत साकारला जाणार आहे.

पहिल्यांदाच देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांमधील अव्वल पैलवान एकाच मैदानात आमनेसामने येणार असून, हा थरारक महासंग्राम कुस्ती महादंगल २०२६च्या रूपाने प्रजासत्ताकदिनी साजरा होणार आहे.

अर्जुन पुरस्कार विजेते, ऑलिम्पियन आणि सध्या मुंबई पोलीस दलात उपायुक्त पदावर कार्यरत असलेले नरसिंह यादव यांच्या संकल्पनेतून, नरसिंह फाउंडेशन आणि नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने ही भव्य एकदिवसीय कुस्ती स्पर्धा २६ जानेवारीला दुपारी २ ते सायंकाळी ७ या वेळेत विलासराव देशमुख मैदान, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

**चार राज्ये चार संघ एकच विजेता!**

या स्पर्धेत महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब ही देशातील कुस्तीची बलाढ्य राज्ये सहभागी होत असून प्रत्येक संघातून ५ पुरुष आणि २ महिला असे एकूण ७ पैलवान आपले कसब पणाला लावणार आहेत. विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे.

चार राज्यांच्या संघांमध्ये मराठा वॉरियर्स (महाराष्ट्र) :पृथ्वीराज पाटील (महाराष्ट्र केसरी, वर्ल्ड मेडलिस्ट),रविराज चव्हाण, आदर्श पाटील, सोनबा गोंगाणे, अक्षय ढेरे.महिला : अमृता पुजारी, सोनाली महाडिकशेर-ए-पंजाब (पंजाब):करणदीप (पंजाब केसरी),संदीप मान, रोहित प्रजापत, उदय शर्मा, अभिषेक यादव.महिला : प्रियंका सिकरवार, शिवानीहरियाणा शूर (हरियाणा):अंकुश, अमित, निवान, आकाश, सागर.महिला : कुसुम दहिया, मोनी गुर्जर.यूपी योद्धा :अभिनायक सिंह (यूपी केसरी), मुलायम यादव, तेजवीर यादव, आयुष चौधरी, विशाल सहानी.महिला : प्रियंका सिकरवार, फ्रीडम यादव यांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक स्पर्धेला केंद्रीय मंत्री पियुष गोयल, मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय मंत्री राम दास आठवले, आमदार अतुल भातखळकर, आशिष शेलार आणि संजय उपाध्याय यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे.यावेळी हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी तसेच जागतिक स्तरावर चमकलेल्या कुस्तीपटूंचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. मुंबईत कुस्तीला व्यापक आणि व्यावसायिक व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने कुस्ती लीगच्या धर्तीवर या एकदिवसीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येथूनच उद्याचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील, हा आमचा विश्वास आहे. भविष्यात देशातील प्रत्येक राज्याचा संघ या महादंगलचा भाग असेल, असे आयोजक नरसिंह यादव म्हणाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)